जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे
कार्यकारी संपादक
विजय पाटील
संपादक मंडळ
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर
मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे
अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ
मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे
व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे
प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

संपादकीय

# नववर्षातील आव्हाने

नवीन वर्षाची सुरुवात कोट्यवधी सर्वसामान्य भारतीयांकरता फारच निराशाजनक झाली. कित्येकांची उपजीविकेची साधने गेली व कष्टाने कमावलेला पैसाही गेला. अनेकांना आपली स्वत:चीच तुटपुंजी बचत बँकेत असूनही ती काढणे शक्य झाले नाही. आणि या दैनेला जबाबदार आहे नरेंद्र मोदी यांनी अत्यंत अव्यवहार्यपणे ८ नोव्हेंबरला केलेली निश्चलनीकरणाची घोषणा! या घोषणेला आता पन्नास दिवस उलटून गेले. जुन्या नोटा बदलून घेण्याची मुदतही ३० डिसेंबरला संपली. पण लोकांचे हाल संपण्याची काही लक्षणे अजून दिसत नाहीत. नवीन वर्षाची सुरुवात झाली, तीच मुळी या नोटाबंदीच्या वैतागात!

५०० आणि १०००च्या नोटा अचानक रद्द केल्यामुळे या जुन्या नोटांच्या बदल्यात नवीन नोटा उपलब्ध नसल्यामुळे चलनाची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या गोंधळाचा अर्थव्यवस्थेवर देखील विपरीत परिणाम झाला आहे. तसे पाहता सकल घरेलू उत्पादनाचे आकडे कितीही फुगवलेले असले तरी हे निश्चलनीकरण सुरू होण्यापूर्वीच अर्थव्यवस्थेने मान टाकण्यास सुरुवात केली होती. एप्रिल ते ऑक्टोबर २०१६ या काळात औद्योगिक उत्पादनात ०.३ टक्क्यांनी घट झाली आहे. निर्यातीचे पुनरूज्जीवन होण्याची काहीही चिन्हे नसल्यामुळे व्यापारातील तूट वाढते आहे. दोन वर्षे सलग पडलेल्या दुष्काळामुळे शेतकी उत्पादनात वाढ होऊ शकलेली नाही. त्यात या नोटाबंदीच्या फटक्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पार मोडकळीस आली आहे. सर्व क्षेत्रांतील उत्पादनात व ग्राहकांच्या मागणीतही लक्षणीय घट झाली आहे.

परिणामी येणाऱ्या काळात बेरोजगारीत वाढ होणार आहे व कमाईत घट. त्याचा फटका सर्वसामान्य जनतेलाच बसणार आहे.

गेले वर्ष हिजबुल कमांडर बुहरान वाणी याच्या हत्येमुळे काश्मीर राज्यात जो जनक्षोभ प्रदीर्घ काळापर्यंत उमटला, त्यानेही गाजले. सुरक्षा सैनिकांनी या आंदोलनकर्त्यांवर केलेल्या प्रचंड दडपशाहीत ८५ तरुण व कोवळ्या वयातील मुलांना आपला जीव गमवावा लागला. 'पेलेट गन्स' वापरल्यामुळे कित्येक तरुणांना आलेल्या अंधत्वाचे भयानक रूपही जगाला या अत्याचारकर्त्यांमुळे पहावयास मिळाले. मोदी सरकारचा आडमुठेपणा असा की, त्यांनी जम्मू काश्मीर राज्यातील सर्व संबंधितांशी राजकीय चर्चेची सुरुवात करण्यास सपशेल नकार दिला आणि काश्मीर खोऱ्यात भारतीय सरकार अरेरावी करत असल्याचा समज पुन्हा एकदा दृढ केला. काश्मिरी जनता दहशतवादाचा बीमोड करण्याच्या नावावर मोदी सरकार सिद्ध करू पहात असलेल्या आत्यंतिक राष्ट्रवादाची बळी ठरली.

या आत्यंतिक राष्ट्रवादाचाच आणखी एक परिणाम म्हणजे भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांचे बिघडलेले संबंध व त्यामुळे उभयपक्षी चर्चेच्या प्रयत्नांना बसलेली खीळ! मोदी सरकारच्या युद्धखोर वृत्तीचा आणखी एक नमुना म्हणजे सप्टेंबर महिन्याच्या शेवटी त्यांनी केलेला 'सर्जिकल स्ट्राईक'. याचा उपयोग सर्वदूर मोदींची कणखर व निर्णयक्षम नेता म्हणून प्रतिमा तयार करण्याकरताच प्रामुख्याने केला गेला. या सर्जिकल स्ट्राईकचे यश किती बेगडी होते, ते बारामुल्ला व नागरोटा येथील आपल्या सैनिकी तळावर दहशतवाद्यांनी ताबडतोबीने केलेल्या हल्ल्यांतून पुरेसे स्पष्ट होते. दहशतवादी हल्ले कमी होण्याऐवजी सैनिकी तळांवरील हल्ले व सीमेवर होणाऱ्या नियंत्रण रेषेवरील गोळीबाराच्या घटनांमध्ये वाढच झाली आहे. २०१६ साली जम्मू काश्मीर राज्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत दुपटीने वाढ होऊन एकूण ६३ भारतीय सैनिक मारले गेले आहेत. हिंदुत्ववादी राष्ट्रवादाच्या अतिरेकामुळे नागरिकांच्या अधिकारांवर व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आली आहे.

२०१६ या वर्षाची सुरुवात झाली ती जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थी नेत्यांवर दाखल केलेल्या देशद्रोहाच्या आरोपाने! राजकीय मतभेद व अतिरेकी हिंदुत्वाला विरोध म्हणजे 'देशद्रोह' हा प्रकार वर्षभर सुरूच होता. लेखक व कलाकारांवर दबाव आणणे तसेच प्रतिगामी विवेकशून्य तत्त्वांना प्रोत्साहन देणे नित्याचेच झाले आहे.

२०१५ सालाने विखारी गोहत्या बंदी मोहिमे अंतर्गत झालेली मोहम्मद अखलाखची नृशंस हत्या पाहिली तर २०१६ सालाने गुजरात राज्यातील उना गावात उन्मादी गोरक्षकांनी अत्यंत कपटाने केलेला दलितांवरील अत्याचार अनुभवला. रोहित वेमुलाची झालेली संस्थात्मक हत्या व उना येथील अत्याचाराची घटना यामुळे देशभरात दलित व डाव्या संघटनांनी या दलितविरोधी हिंदुत्व शक्तींविरोधात आंदोलन उभारले.

मोदी सरकारने आपले अमेरिकेशी असलेले सूत अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने आणखी पावले

उचलली आहेत. २०१६ सालने भारत-अमेरिका यांतील संरक्षण कराराचे पुढील दहा वर्षांसाठी झालेले नूतनीकरण पाहिले. पाठोपाठ आला 'लॉजिस्टीक पुरवठा करार!' लगेचच भारत हा अमेरिकेचा संरक्षणविषयक प्रमुख भागीदार झाल्याची घोषणा झाली. आता अमेरिकेत ट्रम्प सत्तेत आल्यावर तर मोदी सरकार देशांतर्गत प्रतिगामी धोरणे राबवून आपल्याला दुय्यम स्थान देणारे हे संबंध अधिक दृढ करतील, असे समजावयास हरकत नाही.

१५ कोटी कामगारांनी पुकारलेला २ सप्टेंबरचा देशव्यापी सार्वजनिक संप, जुलूम जबरदस्तीने केलेले भूमी अधिग्रहण व नागवणूक या विरोधात झारखंड, आंध्र प्रदेश, तेलंगणा व इतर अनेक ठिकाणी झालेले लढे, हैद्राबाद केंद्रीय विद्यापीठ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ व इतर शैक्षणिक संस्थांत विद्यार्थ्यांनी केलेली आंदोलने, मनरेगा, वनाधिकार कायदा व सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अंमलबजावणी संदर्भातील असंख्य लढे, महिलांवरील अत्याचारांविरोधात व त्यांना समान अधिकार मिळावेत म्हणून उभारली गेलेली आंदोलने, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या व दलितांचे अधिकार नाकारणाऱ्या हिंदुत्ववादी शक्तींचा निषेध हे सर्व या २०१६ सालात घडले.

मात्र या सर्व लढ्यांची व आंदोलनांची तीव्रता व व्याप्ती या प्रतिगामी शक्तींविरुद्ध राजकीय परिणाम साधण्यास अपुरी आहे. येत्या काळात अशी आंदोलने अधिक तीव्र केली पाहिजेत, नवीन भागांत व नवनवीन क्षेत्रांत नेली पाहिजेत. या नोटाबंदीच्या निर्णयामुळे पुढे वाढून ठेवलेल्या आर्थिक अडचणी बघता तर हे प्रयत्न विशेषत्वाने होणे आवश्यक आहे.

सर्वसाधारणपणे नवीन वर्षाचे स्वागत चांगल्या बातम्या व आशावादाने करायला हवे. मात्र हे वर्ष या परंपरेत बसणारे नाही. जगभरात प्रतिगामी विचार, इतर देशांबद्दल तिरस्काराची भावना व वंशद्वेष वाढीला लागल्याचे दिसून येत आहे. भारतात देखील या विचारांचेच भाऊबंद सत्तेवर आहेत. याच्या परिणामी एकाधिकारशाही, जनतेच्या आर्थिक अधिकारांवर प्रतिगामी हल्ले व धर्मांधता वाढतच जाणार आहे. हे हल्ले रोखून धरण्याचा व योग्य पर्याय देऊन जनतेला लढ्यात उतरवण्याकरता संघटित करण्याचा सर्व डाव्या, लोकशाहीवादी व प्रगतिशील शक्तींनी निर्धार केला पाहिजे. याकरता गरज आहे ती वर्गलढे व जनसंघर्षाच्या माध्यमातून सर्व डाव्या आणि लोकशाही शक्तींनी एकत्र येण्याची!

★ ★ ★

# नोटाबंदी : पंतप्रधानांनी उत्तर दिले पाहिजे!

१००० आणि ५०० रुपयांच्या नोटाबंदीबाबतच्या पुढील घोषणा ३० डिसेंबरला केल्या जातील असे पंतप्रधानांनी जाहीर केले होते. या नवीन घोषणा करीत असताना खालील पावले उचलली जावीत अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्यूरो करीत आहे,

१) लोकांनी बँकेत जमा केलेल्या स्वकष्टार्जित पैसे काढण्यावर ज्या मर्यादा घालण्यात आल्या आहेत त्या ३० डिसेंबरच्या अंतिम तारखेनंतर त्वरीत मागे घेण्यात याव्यात.

या नोटाबंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्था स्तब्ध झाली आहे. ज्याचा फटका, जे केवळ रोजंदारीवर जगत असतात अशा गरीबांना आणि खालच्या वर्गाला बसत आहे. त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या मंदीला प्रतिबंध करण्यासाठी खालील उपाय त्वरित योजले पाहिजेत,

२) शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीचे काम अस्ताव्यस्त झाले असल्याने त्याला प्रचंड अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे त्याला त्वरित कर्जमाफी द्यावी.

३) मनरेगाची तरतूद दुप्पट करावी, ज्यामुळे ज्यांची नोंदणी आहे त्यांना १०० दिवसांचा रोजगार नक्की मिळेल.

४) रोखीच्या व्यवहारांवर अवलंबून असणाऱ्या छोट्या आणि मध्यम उद्योगधंद्यातील आर्थिक घडामोडी पूर्णपणे थंडावल्या असल्याने त्यांना करसवलत देण्यात यावी.

५) सहकारी बँकांवर पैसे जमा करण्याबाबत आणि काढण्याबाबत ज्या मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत, त्या ताबडतोब मागे घेण्यात याव्यात. एखाद्या विशिष्ट सहकारी बँकेविरोधात गैरव्यवहाराबाबत जर काही नेमके प्रकरण असेल तर त्याबाबतची कारवाई चालू ठेवावी, पण संपूर्ण ग्रामीण भागाचा कणा असलेली सहकारी व्यवस्थाच उध्वस्त करता कामा नये.

**या नोटाबंदीमुळे अनेक राज्यांच्या महसुलात घट आली आहे, या गंभीर प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी,**

६) केंद्र सरकारने राज्य सरकारांना त्यांच्या महसुलात आलेल्या तुटीची नुकसान भरपाई दिली पाहिजे.

७) एफआरबीएम कायद्याप्रमाणे राज्य सरकारांवर असलेली उधारीवरची मर्यादा राज्यांतर्गत सकल उत्पादनाच्या ३ ते ४ टक्क्यांनी वाढवावी.

**पंतप्रधानांनी सातत्याने रोखविरहीत अर्थव्यवस्थेच्या आवश्यकतेबद्दल घोषा लावलेला आहे, पण त्याचा अतिरिक्त भार जनतेवर पडणार नाही याची जनतेला खात्री पटविण्यासाठी,**

८) डिजिटल व्यवहार मोफत केले पाहिजेत.

९) सर्व रेशन कार्डधारकांना त्यांचा पुरवठा झालाच पाहिजे. आधारकार्डाच्या सक्तीमुळे रेशन नाकारले जाणाऱ्यांची संख्या मोठी असेल.

**नोटाबंदीतून किती पैसा बँकेत आला याबद्दल पंतप्रधानांनी सार्वजनिकपणे सांगितले पाहिजे. दोन आठवड्यापूर्वी आरबीआयने ८२ टक्के जुन्या नोटा बँकेकडे आल्या आहेत असे जाहीर केले आहे,**

१०) बंद झालेल्या सर्व नोटा बँकेकडे आल्या आहेत?

जर तसे असेल तर सर्व काळा पैसा पांढऱ्या पैशात रुपांतरीत झाला असा त्याचा अर्थ होईल. जर जास्त आल्या असतील तर त्याचा अर्थ होईल सर्वच बनावट चलन कायदेशीर झाले.

११) आतापर्यंत किती नव्या नोटा छापल्या गेल्या आहेत, त्यांचे मुल्य किती आहे?

१२) बंद केलेल्या नोटांच्या मूल्याइतक्या मूल्यांच्या नोटा नव्या नोटांच्या रुपात पुन्हा केव्हा चलनात येतील?

**पंतप्रधान भ्रष्टाचार नष्ट करण्याबद्दल बरेच बोलत होते,**

१३) मग व्यापमं, सहारा-बिर्ला डायऱ्या वगैरे प्रकरणांबाबत सरकारने कोणतीही चौकशी का चालू केलेली नाही?

१४) आपलेच स्वकष्टार्जित पैसे काढण्यासाठी रांगेत उभे असलेल्या १०० जणांचा मृत्यू झालेला आहे. त्यांच्या कुटुंबाना त्वरित पुरेशी नुकसान भरपाई दिली गेली पाहिजे.

*(पान ५ पहा)*

# नमोरुग्णांची नजरबंदी

डॉ. उदय नारकर

गेल्या महिन्या दोन महिन्यात निश्चलनीकरण हा शब्द मुखोमुखी झाला. सामान्य लोकांनी त्याला आपल्याला समजेल असे नाव दिले. 'नोटाबंदी'. भारतीय लोकशाहीला ग्रासणारे तीन राक्षस मोदींनी शोधून काढले होते. काळा पैसा, दहशतवाद आणि नक्षलवाद. या तिन्ही गोष्टींचा लोकशाहीला कमीजास्त प्रमाणात धोका आहे, हे सांगायला कुणालाही पंतप्रधान होण्याची गरज नाही. पण त्या साऱ्यांवर ५०० आणि १०००च्या नोटा चलनातून काढून घेणे, त्याही एका रात्रीत, हाच रामबाण उपाय असल्याचे नरेंद्र मोदींनी जाहीर केले. काळ्या पैशाचा प्रश्न मुळात काळ्या संपत्तीचा आहे. काळी म्हणजे अवैध. सरकारच्या कर आकारणीपासून दडवलेली. त्यात चलनी नोटा येतात हे खरे. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे सर्वच अर्थतज्ञ सांगतात. खरी काळी संपत्ती आहे रियल इस्टेट, सोने - जडजवाहिर आणि परदेशात गुंतवलेली. नोटाबंदी केली की, वरची सर्व दुखणी मी बंद करीन, अशी दर्पोक्ती मोदी करत राहिले. त्यांच्या नाकावर टिच्चून काळा पैसा लोक जमवतच राहिले. तेही नव्या दोन हजारांच्या नोटात. काश्मिरात दहशतवाद्यांना अवैध पैसा जमवण्याचा नवा मार्ग सापडला. त्यांनी बँक फोडल्या आणि पवित्र झालेला पैसा चलनात आणला. गडचिरोलीतील नक्षलवादी ट्रकच्या ट्रक जाळत राहिले. सर्वांचे उद्योग मागील पानावरून बिनतक्रार चालूच राहिले.

लोक त्रास सहन करत राहिले. बँकांसमोरील रांगांत निमूटपणे आपलेच पैसे मिळतील या अपेक्षेने उभे राहिले. कित्येकांसाठी ती अक्षरश: जगण्या मरण्याची लढाई ठरली. आजवर देशासाठी सीमांवर शत्रूशी लढता लढता प्राणांचे बलिदान करणे, हे उदात्त मूल्य मानले जाई. आता बँकांसमोरील रांगेत उभे राहून मृत्यूशी दोन हात करणे, हीच देशभक्तीची चरमसीमा असल्याचे 'नमोरुग्ण' धमकावून सांगू लागले. पूर्वी रेशनच्या रांगेत लोक उभे रहात. त्या काळाची खिल्ली उडवणे हा तर या मंडळींचा आवडता टाईमपास.'बघा समाजवादाने तुम्हाला काय दिले', असे म्हणत खुल्या बाजारपेठेची भलामण करणारे हे तथाकथित देशभक्त. तो समाजवाद नव्हता. तरी त्यामागे जनतेची गरज भागली पाहिजे, हा विचार होता. स्वकष्टाने कमावलेला स्वत:चाच पैसा मिळविण्यासाठी लोकांना यांनी रांगेत उभे केले. त्यामागील विरोधाभास पहायचीही संवेदनशीलता त्यांच्यात नाही. अपंगानेही चित्रपटगृहात राष्ट्रगीत चालू असताना उभे राहिलेच पाहिजे, अशी राष्ट्रभक्तीची विकृत संकल्पना रुढ व्हायचा हा काळ. तुम्ही 'नमोरुग्ण' असाल तरच देशभक्त अशी व्याख्या डोक्यावर मारायचा काळ. त्यांनी ठरवून टाकले, 'नोटाबंदी आणि नोटाबंदी'च, हाच देशासमोरील रोगांवर जालीम उपाय आहे. देशातील सूज्ञ सांगत होते हा नोटाबंदीचा खेळ दुसरे तिसरे काही नसून तो नजरबंदीचा खेळ आहे. नरेंद्र मोदींनी आपल्या ३१ डिसेंबरच्या भाषणात हेच सिद्ध केले.

नववर्षाच्या पूर्वसंध्येला पंतप्रधान काय बोलतात, त्यांच्या नोटाबंदीच्या धडाकेबाज मोहिमेला किती यश मिळाले, किती काळा पैसा सरकारच्या तिजोरीत जमा झाला, किती काळाबाजारवाले त्यांनी पकडले, देशाची अर्थव्यवस्था कशी सुधारली, किती शेतकऱ्यांना कर्जाच्या खाईतून बाहेर काढले, किती भांडवलदारांचे दारिद्र्य दूर केले, किमान जनतेने बँकांमध्ये किती पैसा जमा केला आणि बाहेर किती आहे? याची माहिती देशातील जनतेला सांगतील ही अपेक्षा फोल ठरली. तीस डिसेंबरपर्यंत आपल्या सरकारने काय मर्दुमकी गाजवली, हे सांगायची केवढी मोठी संधी त्यांच्यासमोर होती. देशातल्या सर्व वाहिन्यांनी आपला प्राईम टाईम देशाच्या 'भाग्यविधात्याच्या' चरणी वाहिला होता. मोदी बोलतात कसे, विरोधकांची खिल्ली उडवतात कसे, ते किती थोर वक्ते आहेत म्हणून त्यांची पूजा करणारे भक्त निरांजने पेटवून टीव्हीसमोर बसले होते. त्यांचे भाषण प्रसारित करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खुर्दा झाला. आपल्या सुलतानी धोरणाने ज्या हालअपेष्टा जनतेवर लादल्या त्यांचा खुलासा देण्याची आपल्यावर किमान जबाबदारी आहे, याची जाणीवही सम्राट नरेंद्रांच्या बोलण्यात जाणवली नाही. तोंडातून बाहेर पडली ती निरर्थक हवा. शेवटी छप्पन इंची छातीत भुसाच भरला आहे हे पुन्हा एकवार सिद्ध झाले. ३१ डिसेंबरला ते बोलले त्यातील जनतेला काय माहित नव्हते? आणि ते जाहीर करायला दीडशेहून अधिक लोकांचे प्राण घ्यायची काय गरज होती?

बँकांचे वरिष्ठ अधिकारी भ्रष्ट आहेत हे कुणास ठाऊक नव्हते? ते भ्रष्ट असल्याशिवायच विजय मल्ल्याने १० हजार कोटी बुडवले? आणि भांडवलदारांनी लहान लहान नव्हे तर पाच लाख कोटीहून जास्त बुडवले ते बँक अधिकारी सामील असल्याशिवाय? सरकारी अधिकारीही भ्रष्ट असल्याचा साक्षात्कार पंतप्रधानांना झाला. जनतेसमोर वल्गना करताना जीभ चालते, मग आपल्या कार्यालयात गेल्यावर त्यांच्याविरुद्ध कारवाई करायला गेल्या अडीच वर्षात त्यांचे हात कुणी बांधले होते? या देशात भ्रष्टाचाराचे मूळ बडे भांडवलदार-नोकरशहा-राजकारणी यांच्या साखळीत असल्याचे आपला पक्ष सांगत आला आहे. त्यांना हात लावायचे धाडस सरकारने दाखवलेले नाही.

मोदींच्या भाषणातील बाकीच्या घोषणा अर्थसंकल्पात शोभणाऱ्या आहेत. पण हे मोदींच्या कार्यशैलीला धरूनच झाले. अर्थमंत्र्यांचे काम स्वत:च करायचे. परराष्ट्र मंत्र्याचे काम स्वत:च करायचे. एक गोष्ट खरीच. मोदींनी पन्नास दिवस मागितले होते. ते भरले. या सरकारचे उरलेले पन्नास केव्हा भरतील याची कष्टकरी जनता संयमाने वाट पहात आहे. राजाच्या अंगावर कपडे नव्हते हे साऱ्यांनाच दिसत होते. ज्यांना हे कळत होते. त्यांना ते पापी असल्याचे नमोरुग्णांनी ठरवून टाकले होते. पण डोळ्यावर कातडे ओढून घेतल्याने सत्य थोडेच झाकता येते? करायला गेले एक, झाले भलतेच, अशी सरकारची अवस्था झाली आहे. देशाचे निश्चलनीकरण करता करता आपलेच वस्त्रहरण होईल अशी शंकासुद्धा सरकारला आली नसावी. काळ कठोर असतो, याचे प्रत्यंतर भाजप सरकारला येत रहाणारच आहे.

★ ★ ★

## (नोटाबंदी... पान ४ वरून)

१५) या नोटाबंदीच्या निर्णयाच्या परिणामी देशाला किती आर्थिक नुकसान सोसावे लागले आहे याचा सरकारी अंदाज काय आहे?

१६) ८ नोव्हेंबर २०१६ला नोटाबंदीचा निर्णय घोषित झाल्यानंतर किती लोक नोकऱ्या आणि रोजगाराला मुकले आहेत?

पंतप्रधानांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत आणि प्रचंड त्रास सहन करत असलेल्या बहुसंख्य जनतेला थोडाफार दिलासा देण्यासाठी तरी आवश्यक उपाययोजना केल्या पाहिजेत, ते फार महत्वाचे व गरजेचे आहे.

*(३० डिसेंबर २०१६)* **(अनुवाद : राजीव देशपांडे)**

# होय, शक्य आहे! - अजिंक्य फिडेलचा चिरंतन संदेश

**राऊल कॅस्ट्रो**

*(क्युबाच्या कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कमिटीचे प्रथम सचिव आणि क्युबाचे अध्यक्ष राऊल कॅस्ट्रो यांचे भाषण खाली देत आहेत, क्युबन क्रांतीचे सेनापती फिडेल कॅस्ट्रो रुझ यांच्या स्मृतीला सॅन्तियागोत राजकीय सलामी देण्यासाठी शहराच्या महापौरांनी ३ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या सभेत राऊल कॅस्ट्रो बोलत होते. २०१६ हे क्युबन क्रांतीचे ५८वे वर्ष आहे.)*

आज दुपारी या लढाऊ या शहरात फिडेलच्या अस्थी १९५९ मध्ये ज्या मार्गानं स्वातंत्र्याचा तांडा निघाला त्याच मार्गावरून विरुद्ध दिशेने आल्या. क्रांतीचं जन्मस्थान असलेल्या सॅन्तियागोत क्रांतीच्या प्रत्येक संस्मरणीय स्थळी अस्थी आल्या व त्या प्रत्येक ठिकाणी देशभरातल्या इतर ठिकाणांप्रमाणेच जनतेचा प्रेमसागर उचंबळून आला.

उद्या त्याच्या अस्थी एका अत्यंत साध्या समारंभात आपला राष्ट्रीय युगनेता होसे मार्तीच्या अस्थींच्या शेजारीच चिरनिद्रेसाठी ठेवण्यात येतील. आजूबाजूला असतील अस्थी फिडेलच्या मोन्काडा, ग्रानमा आणि आंतरराष्ट्रीय क्रांतीलढ्यांच्या लढाईत शहीद झालेल्या असंख्य कॉम्रेड्सच्या.



तेथून काही फुटांच्या अंतरावरच आहे स्मृतिस्थान आपल्या मातृभूमीच्या मातापितांचे - कार्लोस मॅन्युएल सेस्पेदेस आणि मारियाना ग्राजालिस यांचे. मारियाना केवळ क्रांतीत बेडरपणे लढलेल्या मासिओ बंधूंची आई नव्हती; ती आपणा सर्वांचीच माता आहे. शेजारीच चिरनिद्रा घेतोय अविस्मरणीय लढवय्या फ्रॅन्क पै गार्शिया. त्याचा भाऊ जोसू याच शहरात लढता लढता धारातीर्थी पडला आणि त्यानंतर केवळ एका महिन्यात २२ वर्षाच्या फॅन्कला हुकूमशहा बातिस्ताच्या मारेकऱ्यांनी गोळ्या घालून ठार केलं. कोवळ्या वयाच्या फ्रॅन्क क्रांतीयुद्धात स्पृहणीय कौशल्य दाखवलं. ३० नोव्हेंबर १९५६ रोजी ८२ क्रांतिकारकांना घेऊन आलेल्या ग्रानमा होडक्याच्या आगमनाप्रीत्यर्थ सॅन्तियागोत झालेल्या उठावाचं नेतृत्व फ्रॅन्कनं केलं होतं. (ग्रानमा म्हणजे 'आजी.' प्रेमानं ठेवलेल्या या नावाच्या होडीत फक्त १२ लोक बसायची क्षमता होती.) इतकंच नव्हे, तर सिएरा मेस्रा नावाच्या पर्वतराजीत गनिमी काव्यानं लढणाऱ्या तुकड्यांना दारुगोळा आणि लढवय्ये सैनिक पुरवण्यातही त्यानं मोलाची कामगिरी बजावली होती.

२५ नोव्हेंबर रोजी क्यूबन क्रांतीच्या युगनायकाचे निधन झाल्याची वार्ता कानी पडल्यापासून क्यूबन जनता दु:खसागरात बुडून गेली आहे. फिडेल शारीरिक दृष्ट्या जनतेच्या नजरेपासून दूर झाल्यानं जनतेचं कधीही भरून न येणारं नुकसान झालेलं असलं तरी स्वत: फिडेलनं १ मे २००० रोजी जनतेला दिलेल्या क्यूबन क्रांतीच्या संकल्पनेशी एकनिष्ठ रहाण्याच्या शपथेची याद विसरलेले नाहीत. त्यामुळेच या अत्यंत कठीण प्रसंगी क्युबन जनतेनं देशभक्ती, एकजूट, शिस्त आणि प्रगल्भता यांचं दर्शन दिलेलं आहे. २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी करोडो देशवासीयांनी क्रांतीशी एकनिष्ठ राहण्याच्या आणाभाका घेतल्या.

या अतीव दु:खानं भरलेल्या काळात असंख्य तरुण आणि बालकांनीदेखील क्रांतीच्या आदर्शांशी बांधिलकी दाखवली. त्यांचा क्युबन जनतेला अभिमान वाटतोच, परंतु क्रांती त्यांच्या हाती सुरक्षित आहे, हे पाहून समाधानदेखील वाटते.

फिडेल, त्याचे विचार आणि त्याच्या कार्याची प्रशंसा करणारे संदेश जगाच्या कानाकोपऱ्यातून अविरतपणे येत आहेत.त्यातून जगातील जनतेचं फिडेलविषयीचं प्रेम आणि आदर व्यक्त होत आहे. क्युबन जनता, पक्ष, शासन, सरकार आणि कुटुंबियांच्या वतीनं मी त्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

'जगाचं सारं वैभव धान्याच्या एका दाण्यात सामावलेलं असतं,'असं होसे मार्ती सांगत असे. त्या तत्वज्ञानाशी एकनिष्ठ राहून क्रांतीच्या नेत्यानं व्यक्तिपूजेला ठाम नकार दिला आणि आपल्या आदर्शांशी शेवटचा श्वास घेईपर्यंत ठाम राहिला. त्यांन ठणकावून सांगितलं, 'माझ्या मृत्यूनंतर संस्था, चौक, पार्क्स, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी माझे पुतळे बसवू नका अथवा त्यांना नावं देऊ नका. माझ्या नावाचं कसलंही स्मारक उभं करू नका.'

फिडेलची ही इच्छा पूर्ण करण्यासाठी जनसत्तेच्या राष्ट्रीय संसदेच्या आगामी सत्रात आम्ही योग्य ते प्रस्ताव मंजूर करून घेऊ.

'फिडेलमध्ये भविष्यात प्रवास करून परत येऊन त्याचे विश्लेषण करण्याची अपूर्व क्षमता होती', असं विधान अल्जेरियाचे अध्यक्ष आमचे सन्मित्र बुतेफ्लिका यांनी केलं आहे. कमाग्वे शहराच्या भेटीत २६ जुलै १९८९ रोजी 'येत्या अडीच वर्षात सोव्हिएत युनियन आणि समाजवादी गटाचा अस्त होईल.' असं भाकीत त्यांनं केलं होतं. असं झालंच तर क्यूबा समाजवादाची पताका फडकवतच राहील. तिचं संरक्षण करतच राहील, असं तो म्हणाला होता.

सोव्हिएत युनियन आणि समाजवादी गटाच्या अस्तानंतरचा कालखंड आधुनिक क्यूबाच्या इतिहासातील 'विशेष कालखंड' म्हणून ओळखला जातो. या काळात क्युबन जनतेनं जो अभूतपूर्व संघर्ष केला तो फिडेलचा अधिकार आणि त्याचं जनतेशी असलेलं जिव्हाळ्याचं नातं यांच्या जोरावरच या काळात देशाचा जीडीपी तब्बल ३४.८ टक्क्यांनी घसरला आणि अन्नधान्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. १६ ते २० तास वीजपुरवठा बंद ठेवावा लागे. उद्योग आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जवळ जवळ कोलमडून गेली होती. याही परिस्थितीत देशाचं सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण यांना आम्ही झळ पोहोचू दिली नाही.

या विशेष कालखंडात भेडसावणाऱ्या परिस्थितीला कसा सामना द्यायचा यावर विचार करण्यासाठी देशाच्या वेगवेगळ्या भागात जुलै १९९४ मध्ये आयोजित केलेल्या पक्षाच्या बैठका मला आज आठवतात. या बैठकांतून हा विशेष कालखंड, साम्राज्यवाद्यांची वाढती नाकेबंदी आणि प्रसारमाध्यमांनी जनतेत नैराश्य फैलावण्यासाठी घेतलेली मोहीम ही आव्हाने कशी पेलायची यांविषयी विचारविनिमय झाला. या सर्व बैठकांचा अध्यक्ष फिडेल असे. या सर्व बैठका पार पडल्यानंतर पक्षाच्या नेतृत्वाखाली जनतेचं शहाणपण आणि बळ यांच्या जोरावर आपण या प्रसंगातून तरून जाऊ याची आम्हाला खात्री वाटली. एवंढच नव्हे, तर विशेष कालखंडातील आणीबाणीचे रूपांतर देशाच्या इतिहासातील विजयी युद्धात करता येईल, याविषयी शंका राहिली नाही. आमच्यावर कोसळलेल्या संकटांचा डोंगर आणि शत्रूची नाकेबंदी यातून आम्ही जिवंत राहू, यावर आमच्या बाजूनं पैज लावायला जगातला कोणीही मायेचा लाल तयार नव्हता. पण फिडेलच्या नेतृत्वाखाली आमच्या जनतेनं असीम निर्धार आणि क्रांतीच्या तत्वाशी एकनिष्ठता यांचे अविस्मरणीय उदाहरणच जगापुढं ठेवलं.

२२ वर्षांपूर्वी २६ जुलै १९९४ रोजी फिडेलविषयी मी जे म्हणालो होतो त्याची पुनरुक्ती केली तर ती अस्थानी ठरू नये. मी म्हणालो होतो, फिडेल हा क्युबाचा या शतकातील सर्वात थोर सुपुत्र आहे. मोन्काडाचं ठाणं जिंकणं शक्य आहे, हे त्यानं दाखवून दिलं होतं. ती हरलेली लढाई आम्ही पाच वर्षे, पाच महिने आणि पाच महिने लढून १ जानेवारी १९५९ रोजी जिंकून दाखवली होती.''

मी त्या दिवशी म्हणालो ते मला लख्ख आठवतंय. मी म्हणालो होतो, 'ग्रानमा होडक्यातून क्यूबाचा किनारा गाठणं शक्य आहे, हे त्यानं दाखवून दिलं होतं. अल्जेरियात आमची दाणादाण झाल्यानंतरही सिएरा मेस्राच्या पर्वतराजीत शत्रू, उपासमार, पाऊसवारा आणि थंडीवर मात करून क्रांतीकारक सैन्य उभारणं शक्य आहे, हे त्यानं दाखवून दिलं होतं. नवनव्या आघाड्यांवर गनिमी तुकड्या उभारणं शक्य आहे, हे त्यानं दाखवून दिलं होतं. आपल्या क्रांतीकारक सैनिकांनी केवळ ३०० रायफलींच्या सहाय्यानं १०,००० सैनिकांच्या फौजेवर हल्ला करून त्यांना धुळीला मिळवणं शक्य आहे, हे त्यानं दाखवून दिलं होतं.' या प्रसंगानंतर चे गव्हेरानं आपल्या डायरीत लिहिलं होतं. या विजयानं जुलमी राजवटीचा कणाच मोडला. मी म्हणालो होतो. 'होय, चे गव्हेरा, कॅमिलो, मॅसिओ आणि गोमेझ यांनी दाखवलेली मर्दुमुकी आपल्यालाही अंमलात आणता येईल, हे फिडेलनं दाखवून दिलं होतं, आणि होय, जनतेच्या पाठबळावर बातिस्ताची जुलमी राजवट आणि अमेरिकन साम्राज्यवादाचा पराभव करणं शक्य आहे, हे त्यानं दाखवून दिलं होतं.'

'होय केवळ, ७२ तासात प्लाया गिरोननं क्यूबावर केलेलं आक्रमण मोडून काढता येतं. हे दाखवून दिलं होतं; आणि शत्रूशी रणात लढता लढता एका वर्षात देशातल्या निरक्षरतेचं उच्चाटन करता येतं, हेही दाखवून दिलं होतं. १९६१ मध्ये आपण दाखवलं तसं पुन्हा म्हणता येणं शक्य आहे, होय, साम्राज्याच्या सीमेपासून केवळ नव्वद मैलांवर असलेल्या आपल्या देशातील समाजवादाचा पुकारा करत रहाणं शक्य आहे. १९६१मध्ये अमेरिकेच्या युद्धनौकांनी आपली नाकेबंदी केली, त्याच्या फौजा आपल्यावर आक्रमण करू लागल्या; अमेरिकेनं १९६२च्या ऑक्टोबरमध्ये आपल्यावर सोडण्यासाठी अण्वस्त्रे सज्ज केली तरी त्यांच्या धमक्यांना भीक न घालता आपण म्हणत राहिलो; हो शक्य आहे, आमचं सार्वभौमत्व हा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे, ते आमच्यापासून कुणीही हिरावून घेऊ शकत नाही.

'होय, आपल्या स्वातंत्र्यासाठी वासाहतिक राजवटींशी, आक्रमकांशी आणि वंशवादाशी जीवनमरणाची लढाई करणाऱ्या इतर देशांतील आपल्या भगिनी जनतेच्या खांद्याला खांदा लावून उभं रहाणं शक्य आहे. होय वंशवादी दक्षिण आफ्रिकनांचा पराभव करणं शक्य आहे. अंगोलाच्या सीमांचं रक्षण करत, नमिबियाच्या स्वातंत्र्यलढ्याला मदत करत वंशवादी राजवटींना जोरदार तडाखा देणं शक्य आहे.

'होय, क्यूबाला आरोग्य सत्ता बनवणं शक्य आहे. तिसऱ्या जगातील सर्व देशांत सर्वात कमी बालमृत्यूदर गाठणं शक्य आहे. याबाबतीत आपण अमेरिका आणि कॅनडावरही मात केलेली आहे. जनतेचं सरासरी आयुष्यमान सुधारता येतं, हे आपण दाखवून दिलं आहे, होय, शक्य आहे. क्यूबाचं रूपांतर एका शास्त्रीय प्रयोगशाळेत करणं शक्य आहे; जेनेटिक इंजिनिअरिंग, बायोटेक्नॉलॉजी अशा आधुनिक तंत्रज्ञानात झपाट्याणं प्रगती करणे शक्य आहे; आंतरराष्ट्रीय औषध कंपन्यांनी उभारलेल्या तटबंद्या उध्वस्त करून त्या तंत्रज्ञानाच्या गडात प्रवेश करणं शक्य आहे; अमेरिकन नाकेबंदी असली तरी पर्यटन विकसित करणं शक्य आहे; क्यूबा जास्त आकर्षक बनवण्यासाठी समुद्रमार्गे बनवणं शक्य आहे; आपल्या नैसर्गिक सौंदर्यातून जास्त जास्त आर्थिक लाभ मिळवणं शक्य आहे.

'होय, युरोपात समाजवादी गटाचा अस्त आणि सोव्हिएत युनियनचा विलय झाल्यानंतर निर्माण झालेल्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या एकध्रुवीय जगात आपल्या तत्वांचा त्याग न करता, समाजवादाच्या यशस्वी योगदानाची निगराणी करत, शत्रूशी लढत, त्यांच्या हल्ल्याला न जुमानता पुढील विकास करत रहाणं शक्य आहे.

माणसाची विजिगीषु वृत्ती डळमळीत होत नाही, तो परिस्थितीचं योग्य मूल्यमापन करत रहातो आणि आपल्या न्याय्य आणि उदात्त तत्त्वांचा त्याग करत नाही तोवर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करणं माणसाला शक्य आहे, हा आणि हाच फिडेलनं आपल्याला शिकवलेला धडा आहे.'

वीस वर्षांपूर्वी या माणसाविषयी मी हे शब्द उच्चारले होते. काय प्रतीचा होता हा मनुष्य ? परवाच्या दिवशी अलेग्रियाला झालेल्या भयानक पराभवाचा ६०वा स्मृतीदिन आहे. त्या पहिल्या लढाईतील पराभवानंतरही खचून न जाता, विजयावरील विश्वास ढळू न देता १३ दिवसात सिएरा मेस्राच्या डोंगर दऱ्यांत सात रायफली आणि मूठभर सहकाऱ्यांना घेऊन त्यानं घोषणा दिली. ''आता आपण युद्ध जिकलं आहे!''

आपल्या उदाहरणातून ''होय, हे शक्य होतं, हे शक्य आहे आणि शक्य असेलच'', हे दाखवून देणारा हा अजिंक्य फिडेल, त्याच्या प्रेरणेनंच आपल्याला एकत्र आणलं आहे. मी आजही म्हणतच राहीन, क्यूबात समाजवादाची उभारणी करण्यासाठी, आपल्या मातृभूमीचं सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न करत रहाणं, कसल्याही अडथळ्यांवर निर्धारानं यशस्वी मात करणं आजवर शक्य होतं, आज शक्य आहे आणि उद्याही शक्य असेल.

आज या चौकात, फिडेलच्या अस्थींना साक्षी ठेवून मातृभूमी आणि समाजवादाचं रक्षण करायची आपण सारे शपथ घेऊ या! इथं भव्य ब्रॉझ पुतळ्याच्या रुपात उभ्या असलेल्या अंतोनिओ मासिओ ग्राजालिसच्या सुरात सूर मिसळून म्हणू या, 'क्यूबाला चिरडण्याचा प्रयत्न करणारा प्रत्येक जण नष्ट झाला नाही तर त्याला तिची रक्तरंजित धूळ गोळा करायला भाग पाडू!'

***फिडेल, फिडेल, अस्ता ला व्हिक्टोरिया!***

***फिडेल - तुझेच नाव अजिंक्य!***

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# क्रांतिपर्वाच्या आद्य प्रणेत्या : सावित्रीबाई फुले

डॉ. माया पंडित

सावित्रीबाई फुले यांची ओळख महाराष्ट्राला त्या केवळ जोतीराव फुले यांची पत्नी होत्या एवढीच नाही. महाराष्ट्रातील नव्हे तर अख्ख्या भारतातील त्या पहिल्या स्त्रीशिक्षक होत्या, आपल्या पतीने स्त्रीशिक्षणाचे काम सुरू केले म्हणून केवळ आपण ते करावे, एवढा मर्यादित उद्देश त्यांच्यासमोर नव्हता. भारतातील साऱ्याच शिक्षणापासून, प्रगतीपासून वंचित राहिलेल्यांना माणूस म्हणून सन्मानाने जगता येणे शक्य व्हावे म्हणून आपले सारे आयुष्य वेचणाऱ्या सावित्रीबाई ह्या पहिल्या नेत्या मानाव्या लागतील.

सगुणाबाई क्षीरसागर या जोतिबांच्या मावसबहिणीने शिक्षणाची आणि समाजसुधारणेची जी ज्योत जोतिबांच्या हृदयात पेटवली तीच जोत सावित्रीच्याही हृदयात अखंड तेवत राहिली होती. जोतिबांच्या या विधवा मावसबहिणीला शिक्षणाची अतीव आच होती. त्यांच्यामुळेच जोतिबांच्या वडिलांनी त्यांना मिशनरी शाळेत घातले होते. सावित्रीबाईंनी शिक्षणाचे पहिले धडे जोतिबांकडून घेतले ते शेतातल्या आंब्याच्या झाडाखाली, मातीच्या माटीवर. त्यानंतर त्यांचे भाषेतील प्राविण्य पाहून मिचेलबाईंनी त्यांना थेट ट्रेनिंग कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्षात प्रवेश दिला. सावित्रीबाईंनी १८४७ पर्यंत आपले ट्रेनिंग पूर्ण केले आणि जोतीबांनी काढलेल्या भिडे वाड्यातल्या शाळेत त्या विना वेतन शिक्षिकेचे काम करू लागल्या.



## धर्ममार्तंडांचे वर्चस्व

त्या काळातील सनातनी, बुरसटलेल्या विचारांच्या तथाकथित धर्ममार्तंडांच्या आचारविचारांचे समाजमनावर भयंकर वर्चस्व होते. स्त्रिया शिकल्या तर धर्म बुडेल. विवाहित स्त्रियांचे नवरे मरतील, स्त्रिया अनाचार करतील आणि अनैतिकतेच्या महापुरात सारी सनातन संस्कृती वाहून जाईल असे अपसमज समाजात फार खोलवर रुजले होते. तथाकथित 'अनाचारी' विधवा स्त्रियांना झाडाच्या ढोल्यात बसवून जाळून मारण्यासारख्या घटना घडत. लहान वयात मुलींची लग्ने करणे, जरठकुमारी विवाह करणे, पुरुषांनी अनेक लग्ने करणे, विधवांना जगणे अवघड व्हावे अशा घृणास्पद पद्धतीने वागवणे, त्यांच्या निराधार अवस्थेचा फायदा घेऊन त्यांना फशी पाडणे आणि नंतर त्यांना तोंड दाखवणे मुश्किल करणे, आत्महत्या करायलाही भाग पाडणे अशा भयंकर प्रथा समाजात इतक्या दृढ रुजल्या की, त्याविरुद्ध विचार करणे म्हणजे जणू काही पापात लडबडलेला भ्रष्टाचारच आहे, असे समाजाला वाटे.

जातीव्यवस्था आणि त्यात शतकानुशतके खितपत पडलेल्या माणसांना जनावरापेक्षाही हीन दर्जा देऊन वागवले जाई. अशा समाजाला सुधारायला आणि स्त्रीशूद्रादिकांना माणूस म्हणून सक्षम करण्यासाठी जोतिबा आणि सावित्रीबाईंनी समाजकार्याला सुरुवात केली ती शिक्षणाचा ओघ त्या माणसांच्या मुखी पडावा यासाठी. ही नुसत्या बोलघेवड्या सुधारकांसारखी 'बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात' अशी सुरुवात नव्हती. पूर्ण आयुष्य पणाला लावून स्वत:ला वाहून घेऊन अपमान, टीका सोसत सावित्रीबाईंनी एक नवे माणूसपण अस्तित्वात आणण्यासाठी जे कार्य केले त्याला तोड नाही. ह्या प्रवासाचा मागोवा परिवर्तनाच्या चळवळीतील प्रत्येकाने समजून घ्यायला हवा.

## शिक्षणाचे महत्त्व

सावित्रीबाईंनी शिक्षणाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली त्यात त्यांनी फातिमाबी शेख या मुस्लिम महिलेचे सहकार्य घेतले ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे. ब्राह्मणांच्या शाळेतल्या मुलांना जेवढे यश मिळते तेवढे यश काही वेळा शुद्रातिशूद्रांच्या शाळांतल्या विद्यार्थ्यांना मिळत नाही असे लक्षात आल्यानंतर त्यांनी असा सिद्धांत मांडला की, ज्या समाजात आणि परिस्थितीत गरिबीचा प्रचंड प्रभाव आणि शिक्षणाच्या परंपरांची जबरदस्त उणीव आहे, तेथून येणाऱ्या मुलांना शिक्षणासाठी अधिक कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागते, म्हणून त्यांचे शाळेतून गळतीचे प्रमाण मोठे आहे. त्यासाठी त्यांच्या शिक्षणाची अधिक काळजीकाट्याने व्यवस्था करायला हवी. आज हा सिद्धांत जगन्मान्य झाला आहे. मात्र त्याचे श्रेय सावित्रीबाईंनाच द्यायला हवे. आजही शाळांतून होणाऱ्या कष्टकरी वर्गातील मुलांच्या व मुलींच्या गळतीचे प्रमाण खूप मोठे आहे. बहुजनवर्गातल्या केवळ ४% मुली महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी कॉलेजची पायरी चढू शकतात. हे सावित्रीबाईंना जणू दिसले होते. हा शाळागळतीचा सिद्धांत त्यांच्या द्रष्टेपणाचे प्रतीकच मानायला हवा.

## समाजसुधारणेमागची भूमिका

सावित्रीबाईंना समाजाचा आपल्यावर असलेला प्रभाव झुगारणे सोपे मुळीच गेले नाही. परंतु त्यांना असलेली शिक्षणाची आच आणि जोतीरावांची साथ या दोन महत्वपूर्ण गोष्टींमुळे त्यांची या मार्गावरली निष्ठा मुळीच ढळली नाही. सुधारणा हा त्यांच्या सहजीवनाचा मंत्र होता. जीवनात खरी सुधारणा करायची असेल तर इंग्रजी शिक्षण ही काळाची गरज आहे, त्यापासून आपला फायदाच आहे हे त्यांनी अचूक जाणले होते. सावित्रीबाईंच्या भावावरही सनातनी समाजाचे दडपण होते. एकदा त्याने सावित्रीबाईंना बजावले की, त्या उभयतांनी, म्हणजे जोतिराव व सावित्रीबाईनी, अंत्यजांसाठी चालवलेली कामे कुळास बट्टा लावणारी आहेत; म्हणून त्यांनी ती सोडून द्यावीत व सनातनी ब्राह्मण सांगतात तसेच वागावे.

सावित्रीबाई त्याला म्हणाल्या, ''भाऊ तुझी बुद्धी कोती असून भट लोकांच्या शिकवणुकीने दुर्बळ झाली आहे. तू शेळी, गाय यांना जवळ घेऊन कुरवाळतोस, नागपंचमीस विषारी साप पकडून त्यांस दूध पाजतोस. (पण) महारमांग हे तुझ्यासम मानव असता त्यास अस्पृश्य समजतोस त्याचे कारण काय ? भट सोवळ्या असताना तुझा विटाळ मानतात तुला महारच समजतात. जोतीबा महारमांगांना शिकवतात व मीही त्यांस शिकवते. आम्ही मुलींना शिकवतो, महारमांगांना शिकवतो हेच ब्राह्मणांना अपायकारक होणार या समजुतीच्या कारणास्तव ते आमच्या माणूसधर्माच्या कामाची निंदा, कुटाळक्या करतात व तुझ्यासारख्याच्या मनात किल्मिष पेरतात. हे काम इतके आल्हाददायक आहे की, त्यायोगे मला परमानंद होतो. त्याव्यतिरिक्त मनुष्याची सीमा दृग्गोचर होते'' हे ऐकून तो लज्जित झाला. आणि त्याने सावित्रीबाईंच्या कामाचे महत्व मान्य करून आपला विरोध सोडून दिला.

## पितृसत्ताक धर्मव्यवस्थेला आव्हान

पण केवळ स्त्री आणि शूद्रातिशूद्रांचे शिक्षण यापुरतेच सावित्रीबाईंनी स्वत:ला मर्यादित ठेवले नाही. ज्यावेळी फसविल्या गेलेल्या ब्राह्मण विधवांसाठी आणि त्यांच्या अनाथ लेकरांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह जोतिबांनी काढले त्यावेळी त्यांनी त्या स्त्रियांची व त्यांच्या लेकरांची सर्वतोपरी काळजी घेऊन त्यांना जगण्याला प्रवृत्त केले. बाप, नवरा, मुलगा यांच्या वर्चस्वाच्या त्रिसुत्रीत मनूने बायकांना बांधून ठेवले होते. स्त्रीला स्वातंत्र्य मिळावे अशी तिची पात्रताच नाही, स्त्रीशूद्रादि माणसे ही 'पापयोनी' आहेत आणि म्हणून त्यांना माणूसपणाचा अधिकार नाही असा डांगोरा पिटून त्यांना खऱ्या मानवी जगण्यापासून दूर ठेवणाऱ्या सनातनी समाजात सावित्रीबाईंचे हे काम म्हणजे सनातनी समाजाच्या डोळ्यात घातलेले अंजन होते.

स्त्रियांच्या मनावर, शरीरावर, लैंगिकतेवर बंधने घालून तिला बालविवाहात बांधणे, विधवांना सती, जायला भाग पाडणे, त्यांची लैंगिकता ही जणू काही पुरुषांची मालमत्ता आहे असे समजून त्यांच्यावर अत्याचार करणे यातच पुरुषार्थ मानणाऱ्या समाजाला त्यांच्या या कृतीने त्यांनी जणू आसूडाने फटकारले. आपल्याला मूल नाही म्हणून वाईट वाटून न घेता त्यांनी स्वत: त्यांच्याच आश्रमात बाळंत झालेल्या विधवेच्या यशवंत या मुलाला दत्तक घेतले. आईच्या मायेने वाढवले. प्रेम, घर, निवारा, डॉक्टरकीचे शिक्षण दिले आणि त्याचे आयुष्यच घडवून उभे केले.

त्यांचे हे सारेच कार्य इतके मोठे आहे की, त्यांना भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या उद्गात्या, आद्य कार्यकर्त्या मानले पाहिजे. जातीप्रथा, स्त्रीदास्य यांना खडे आव्हान देऊन त्यांनी इथल्या जातीव्यवस्थेला आणि पितृसत्ताक धर्मपद्धतीला प्रचंड धक्का दिला. एकदा त्यांनी एका ब्राह्मण-महार विवाहाला सर्व समाजाच्या विरोधात जाऊन पाठिंबा दिला होता. खरेतर त्या जोडप्याला गावकऱ्यांनी खूप मारले होते आणि नंतर ठार मारण्याचे कारस्थानही केले होते. पण त्यांना सावित्रीबाईंनी कायद्याचा धाक घातला आणि परावृत्त केले. इतकेच नव्हे तर त्या जोडप्याला नंतर जोतिबांकडे पाठवून त्यांना जीवन उभे करण्यासाठी मदतही केली.

सर्व मानव ही ईश्वराची लेकरे आहेत हे आपल्याला कळत नाही तोपर्यंत त्याचे खरे स्वरूप आपल्याला कळणार नाही असेही त्यांनी बजावले होते. जाती, उच्चनीचता, या मानवनिर्मित आहेत; उच्चनीचतेचे तत्त्वज्ञान हे पाखंडी लोकांनी आपल्या स्वार्थासाठी निर्मिले आहे असे त्यांचे सांगणे असे. त्यांच्या कार्याला संपविण्यासाठी सनातन्यांनी त्यांच्यावर अविरत हल्ले केले पण त्या मागे हटल्या नाहीत. आम्हाला मागे ठेवले गेले आहे हे ओळखून असे करणाऱ्या लोकांशी लढणे हेच शेवटपर्यंत त्यांच्या जीवनाचे ध्येय राहिले.

## मानवतेच्या कार्यात जीवन समर्पण

जोतिबांना १८८८ साली अर्धांगवायूचा झटका आला आणि ते अंथरुणाला खिळून पडले. पण सावित्रीबाईंनी हार मानली नाही. दोन वर्षे अविरतपणे त्यांनी जोतिबांची सेवा केली. सुमारे ५० वर्षे पतीच्या संगतीत त्यांच्या खांद्याला खांदा लावून अख्ख्या सनातन सत्तेशी झगडा करीत समाजसुधारणेच्या कामात कार्यरत राहिलेल्या या स्त्रीने जोतिबांच्या मृत्यूनंतरही हे कार्य मुळीच सोडले नाही. जोतिबांच्या मागे उरावर दगड ठेवून त्यांनी सत्यशोधक समाजाचे काम सुरूच ठेवले. ज्यावेळी १८९७ साली पुण्यात प्लेगची साथ पसरली त्यावेळी प्लेगच्या रोग्यांना यशवंत या आपल्या मुलाच्या दवाखान्यात आणून त्यांच्यावर उपचार करत त्यांनी अनेकांना जिवाच्या कराराने मृत्यूच्या तोंडात जाण्यापासून वाचविले. दुर्दैवाने एका प्लेगपीडित दलित मुलाला स्वत:च्या खांद्यावरून दवाखान्यात आणताना त्यांना प्लगचा संसर्ग झाला आणि १० मार्च १८९७ रोजी त्यांची प्राणज्योत मालविली. त्यांच्या आयुष्याची सांगता झाली. आपल्या तथाकथित आधुनिक जगात आपल्याला समर्पणाचे असे किती दाखले आढळतील ?

सावित्रीबाईंचे कार्य व विचार अतिशय महत्वाचे आहेत. आज २१व्या शतकात रोहितसारख्या दलित मुलांना विद्यापीठात आत्महत्या करायला भाग पाडले जाते; हिंदु धर्ममार्तंड आजही बाईचे समाजातले स्थान मुलगे (तेही दहा दहा )जन्माला घालण्यापुरते सीमित ठेवायचा प्रयत्न करतात, आंतजातीय विवाह करणाऱ्यांना ठेचून-जाळून भोसकून मारले जाते, हिंदू उच्चवर्णीय सोडून अन्य धर्माचे लोक शत्रू आहेत म्हणून त्यांना मारले जाते....अशा हिंसक आणि उद्दाम सत्तावंतांच्या कालखंडात जोतिबा आणि सावित्रीबाईंनी लावलेली शिक्षणाची, मानवतेची, मानवी हक्कांची ज्योत प्रज्वलीत ठेवण्याची जबाबदारी आपली आहे. ती ओळखून तसा मानवी मूल्यांवर आधारलेला समाज प्रत्यक्षात आणण्याची धुरा आपण पेलली पाहिजे. ती काळानेच आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आहे. सावित्रीबाईंचे स्मरण करून हा वसा आपण उचलूया.

★ ★ ★

## (शेतकऱ्यांचे उध्वस्तीकरण... पान १३ वरून)

नोटाबंदीमुळे कोलकाता आणि उत्तर भारतामध्ये बाजारातील विक्री मोठ्या प्रमाणात घटलेली आहे, असे नागपूर शेतकी उत्पादन बाजार समितीचे संचालक आणि संत्री उत्पादक शेतकरी राजेश छाब्रानी सांगतात.

'आज (२८ नोव्हेंबर) संत्र्यांच्या किंमती टनाला ४०,००० रुपयांपासून २५ ते ३० टक्क्यांनी उतरल्या आहेत. कारण रोज जे कोलकात्याला जवळपास १२ ट्रक संत्री जात असत, ते पूर्णपणे थांबलेले आहे.

नोटाबंदीच्या निर्णयासाठी निवडलेली वेळ चुकीची असल्याचे छाब्रानी सांगतात. 'आमच्या बाजारात वर्षभरात १५०० कोटी रुपयांचा व्यवहार होते. त्यातला जवळपास निम्मा ऑक्टोबर ते डिसेंबर या तीन महिन्यांत होतो. त्यामुळे हे तीन महिने आमच्यासाठी अत्यंत कळीचे असतात', ते म्हणतात.

लागोपाठची काही वर्षे दुष्काळाची गेल्यानंतर याच वर्षी चांगला पाऊस झाला, परिणामी चांगली उत्पादने आली आणि आता आपले उत्पन्न चांगले होणार अशी शेतकऱ्यांना आशा वाटली होती. अशावेळी नोटाबंदीच्या निर्णयाने शेतकऱ्यांची पाठ पुन्हा एकदा मोडली आहे.

*('परिवर्तनाचा वाटसरू'मधून)*

## सीटू राज्य कौन्सिलची बैठक

### दि. १५ जानेवारी २०१७, औरंगाबाद

सीटूच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलची बैठक रविवार, दिनांक १५ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १० वाजता शहीद भगतसिंग हायस्कूल, बजाज नगर, वाळूंज एमआयडीसी, औरंगाबाद येथे सीटूचे राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांच्या अध्यक्षतेखाली व सीटूचे राष्ट्रीय महासचिव खासदार तपन सेन यांच्या उपस्थितीत होणार आहे.

तरी सर्व सदस्यांनी या बैठकीस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**ॲड. एम. एच. शेख**
**राज्य सरचिटणीस**

**संपर्क : ॲड. उद्धव भवलकर, मोबाईल : ९४२२२०२०६४**

# धर्मसत्ता आणि साहित्य

डॉ. दीपक बोरगावे

धर्मसंस्था ही प्राचीन काळापासून सामाजिक व सांस्कृतिक मानवी व्यवहारात महत्वाची भूमिका बजावत आली आहे. आजच्या अत्याधुनिक काळातही तिचे या संदर्भातले स्थान हे महत्वाचेच राहिले आहे. प्राचीन काळात तर ती राज्यसत्तेबरोबर समांतरपणे कार्यरत होती. ऋग्वेदपूर्व आणि ऋग्वेदोत्तर काळातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहारातील धर्मसंस्थेचा सहभाग काय होता आणि ह्या इतिहास प्रवाहातून नेमके काय घडत गेले ?. याची सांगोपांग चर्चा इतिहासतज्ज्ञांनी खूपदा केली आहे. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे, शास्त्रे, देवदेवतांची निर्मिती, त्यांची मिथकनिर्मिती ह्या वाङमयीन साहित्यकृतींची निर्मिती कशी झाली आणि त्यामाठीमागे कोणती भौतिक परिस्थिती होती आणि त्यातून उत्पादन साधनांवरील मालकी हक्कांसाठी कोणते समाजकारण झाले ? हे सर्व त्यात अनुस्यूत होते; यावरील बरीच चर्चा आणि साहित्य आज उपलब्ध आहेत.

वेद, उपनिषदे, पुराणे, स्मृती, किंवा महाभारत, रामायण, कुराण, बायबल असा संहिता निर्माण झाल्या यापाठीमागे धर्म संस्थेचा मोठा सहभाग होता. किंबहुना धर्मसंस्था ही या सर्व साहित्य निर्मितीमागचा एक प्रमुख स्त्रोत होती असे मानले जाते. डॉ. डी. डी. कोसंबी यांचे *'पुराणकथा आणि वास्तवता'* हा ग्रंथ या विषयावर, प्रकाश टाकणारा आहे. याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गं. बा. सरदार, दुर्गा भागवत, एस. जी. सरदेसाई, गो. पु. देशपांडे, रावसाहेब कसबे या व अशा अनेक तज्ज्ञ आणि संशोधकांचे या विषयावर विपुल साहित्य आज उपलब्ध आहे. धर्मसंस्था ही सनातन आहे. प्राचीन काळात विश्वव्यापार हे एक कोडे होते. ते मानवाला उलगडत नव्हते. भोवताली घडणाऱ्या चमत्कृतीक व विस्मयकारक घटना समजावून घेण्याची त्याची कुवत नव्हती. मानवाला स्वत:मधील आत्मविश्वासपूर्वक सामर्थ्याची जाणीव नव्हती. यातून दैवी शक्ती आणि अतिमनुषत्वाची कल्पना निर्माण झाली. धर्मकल्पनेचा हाच प्रमुख स्त्रोत पुढे शोषणाचे एक हत्यार म्हणून उभा राहिला.

वर्चस्ववादी जात-वर्ण-वर्गाने यातून कोणते साहित्य निर्माण करायचे याचे एक राजकारण ठरले गेले; ज्यात सामान्य शोषितजन अडकून राहिले. हा अंतर्विरोध आणि द्वंद्व सतत टिकविण्यातही आला. स्थितिप्रियता आणि परिवर्तनशीलता या दोन्हीपैकी माणसाच्या मनोव्यापारात कधी बंधनावर तर कधी स्वातंत्र्यावर, कधी स्थैर्यावर तर कधी गतीमानतेवर भर दिला गेला. परिणामत: धर्म आणि साहित्य विचारसुद्धा निरनिराळ्या कालखंडात या दोन टोकांच्या अवकाशात हेलकावत राहिला.

आज आधुनिक आणि जागतिकीकरणाच्या जीवनात धर्माचा हा सनातनी संदर्भ राहिलेला नाही हे जरी खरे असले तरी वेगवेगळ्या स्वरुपात धर्माचे अस्तित्व हे भयंकररित्या जीवंत आहेच. त्याचा मुकाबला करणे हे परिवर्तनासाठी आवश्यक आहे. पण धर्मांध शक्ती हे करू देत नाही. त्याला स्थितीशिलता हवी असते. स्थितीशील जगात जे शोषणाचे अस्तित्व कार्यरत आहे ते मोडीत निघाले तर ह्या शक्तींचे अस्तित्वच धोक्यात येईल अशी रास्त भीती त्यांना असते. गेल्या काही दशकातला जमातवादी, जातीवादी आणि देश विघटन करणाऱ्या शक्तींचा इतिहास पाहिला तर या परिस्थितीचा अंदाज येऊ शकतो. गेल्या दोन वर्षाच्या भाजपच्या राज्यात तर अनेक घटना अशा घडल्या आहेत व घडत आहेत ज्याची काही दिवसांपासून खूप चर्चा होत आहे.

लोकशाही राज्यात स्वातंत्र्य आणि परिवर्तनाला अनन्यसाधारण महत्व असते. समाजसंस्कृती व्यवहारातील गतीमानता आणि प्रवाहीपणा टिकवायचे असेल किंवा त्याला पुढे घेऊन जायचे असेल तर अभिव्यक्तीचा प्रश्न महत्वाचा ठरतो. वाच्य किंवा लिखित रूपात अभिव्यक्त होणे हाच साहित्याचा मुख्य स्त्रोत असतो. पण अभिव्यक्त होण्यातच जर अनंत अडचणी निर्माण केल्या जात असतील तर साहित्यनिर्मितीचा प्रश्न हा गंभीर होऊन बसतो. शिवाय अभिव्यक्ती ही समाजाभिसरण किंवा संस्कृतिभिसरणाचा पायाच असतो. निसर्ग जसा सतत परिवर्तनशील असतो तसेच मानवी जीवनही हे सतत परिवर्तनशिल असते. म्हणूनच जर व्यक्त होण्यालाच पायबंद होत असेल तर मग समाजपरिवर्तन हे निश्चितच धोक्यात येते असे म्हणायला पाहिजे.

लोक काय बोलतात, काय सांगतात, त्यांचे काय म्हणणे आहे, त्यांच्या अडचणी व समस्या काय आहेत ? याला लोकशाहीत खूप महत्वाचे स्थान आहे. हे जर होणार नसेल तर मग वरवर लोकशाही आणि आतून फॅसिझम, दंडेलशाही, दडपशाही, एकचालकानुवर्ती शासनपद्धती असे चित्र उभे राहते. म्हणजे मला जर काही म्हणायचे असेल तर अशा प्रतिकूल परिस्थितीत मी ते म्हणायला धजावणार नाही. कारण मी प्रतिगामी शक्तींचा पंगा घेईल असा त्याचा अर्थ होईल; आणि मग वृथा मी मला धोक्यात कशाला अडकवू अशी ती वृती असते. पण समाजात परिवर्तनशील शक्ती जाग्या असतातच. त्या तशा भूमिकाही घेत असतात. देशातील असहिष्णुतेच्या वातावरणाचा भाग म्हणून काही महिन्यांपूर्वी देशातील अनेक मान्यवर साहित्यिकांनी आपले पुरस्कार निषेधार्थ भावाने परत केले होते. यामागील पार्श्वभूमी हीच होती.

काही क्षणांसाठी लोकशाही व्यवस्था ही बाजूला जरी ठेवली तरीही अभिव्यक्तीचा प्रश्न हा बाजूला सारता येत नाही. फॅसिस्ट किंवा लोकशाहीविरोधी व्यवस्थेमध्येसुद्धा अभिव्यक्तीचाच प्रश्न केंद्रस्थानी असतो. लोकमानस, लोकभावना यांची गळचेपी ही अभिव्यक्तीचीच गळचेपी असते. प्रतिगामी व्यवस्थेला जे स्वीकारार्य आहे तेच व्यक्त होण्यास मुभा असणे हा देखील शेवटी अभिव्यक्तीचाच प्रश्न म्हणून उभा राहतो. फॅसिझमला पचेल तेच साहित्य स्वीकारार्य म्हणून मान्यता पावते. बाकीचे सर्व धुडकावण्यात येते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, सनातन काळापासून धर्माच्या अवडंबराखाली समाजसंस्कृती व्यवहारामध्ये मान्य काय आणि अमान्य काय किंवा कोणाला व कशाला सँक्शन द्यायचे व कोणाला व कशाला मान्यता द्यायची नाही हे वर्चस्ववादी राजकारणातून ठरते. यातूनच धर्म जो वर्चस्ववादी शक्तींचे स्वरूप धारण करून कार्यरत असतो त्या शक्ती समाजातील साहित्य काय असावे किंवा काय असू नये हे ठरवत असतात.

अर्थात बंडखोर साहित्यही उदाहरणार्थ दलित साहित्य, मुस्लीम साहित्य, शोषित जातीवर्गाचे साहित्य हे लोकशाही व्यवस्थेत निर्माण होऊ शकते. पण तरी ते वर्चस्ववादी त्याला सॅक्शन देत नाहीतच शिवाय त्याची जेवढी उपेक्षा करता येईल तेवढी ते करतात. हाच एक मार्ग त्यांना आधुनिक लोकशाही व्यवस्थेत मोकळा असतो. अथवा मग ते छुप्या हल्ल्यांचा आधार घेतात. रंजनवादी, भक्तीवादी, करमणूक प्रधान साहित्य हे त्यांना निरुपद्रवी असते म्हणून त्यांना ते मान्यता देतात, पुरस्कार देतात, अजून नाना गोष्टी करतात. पण गंभीर व प्रागतिक साहित्याबद्दल मात्र ते साशंक आणि बिथरलेले असतात.

युरोपमधील मध्ययुगीन काळात सेंट जोन्स यांचे उदाहरण या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. पोप व उच्च धर्माधिकारी यांना आव्हान देणाऱ्या जोन्सला जिवंत जाळले गेले कारण ती वर्चस्ववादी धर्मसंस्थेला एक मोठा धोका ठरली होती. शिवाय ती एक स्त्री होती आणि मध्ययुगीन काळातील स्त्रियांचे स्थान हे खूप गौण होते. जोन्सही सैनिकासारखा पोषाख घालून घोड्यावरून पुरुष सैनिकांबरोबर लढायला जात असे; हा देखील तिच्याबद्दलचा प्रचंड राग तत्कालीन युरोपीय पुरुषप्रधान व्यवस्थेला होता. ब्रिटिश नाटककार जॉर्ज बर्नड शॉ यांनी जोन्सवर एक स्वतंत्र नाटकच लिहले आहे.

२

हा विषय तसा मोठा आहे; तरीही या लेखात धर्म, सत्ता, राजकारण, साहित्यसंस्कृती व्यवहार या सर्वांची इथे काही समकालीन उदाहरणांसोबत थोडक्यात चर्चा करावयाची आहे. धर्म ही एक सनातन मानव निर्मिती संस्था सत्ता आहे याचा उल्लेख वर आला आहे. मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे धर्म ही समाजाच्या सर्व व्यवहारात एक सुपरस्ट्रक्चर म्हणून काम करते. हे करत असताना समाजाने काय करावे, काय करू नये किंवा थोडक्यात तिची विचारसरणी किंवा तत्वप्रणाली काय असावी वा असू नये हे ठरवत असते. धर्मसंस्थेचा पगडा सर्वच सामाजिक संस्थांवर असतो. साहित्यसंस्था ही देखील एक महत्वाची सामाजिक संस्था त्यांच्या निगराणीखाली असते. धर्मग्रंथ आणि धर्मसाहित्य हे याच पगड्याखाली तयार झालेले असते. प्राचीन काळातील महाकाव्ये ही याची उत्तम उदाहरणे आहेत.

वसंत दत्तोत्रय गुर्जर यांची *'गांधी मला भेटला'* ही कविता या संदर्भात पाहण्यासारखी आहे. ही कविता प्रथमत: एक पोष्टर कविता म्हणून १९८४ साली प्रसिद्ध झाली होती. नंतर तुळजापूरकर यांनी संपादक या नात्याने एका बँकेच्या मॅगेझिनमध्ये (बुलेटिन) ती १९९४ साली प्रसिद्ध केली. महात्मा गांधी हे राष्ट्रपिता आहेत आणि त्यांची काव्य प्रतिमा म्हणून वापर करून अश्लील शब्दांचा या कवितेत प्रयोग केला आहे असा आरोप वसंत दत्तोत्रय गुर्जर यांच्यावर होता. गंमत म्हणजे हे 'पेटीशन' हिंदुत्ववादी पतित पावन संघटनेने केले होते. म्हणजे १९८४ ते १९९४ या दहा वर्षांच्या कालखंडात ही कविता महाराष्ट्रात आणि देशात गाजत असताना यावर कोणताही आरोप झाला नाही; पण जेव्हा ही संहिता जनमानसाच्या मनोव्यापारात फिकी झाली तेव्हा अचानक या संघटनेला गांधींचा उमाळा आला. ज्या महात्मा गांधींची सतत टिंगलटवाळी हिंदुत्ववादी संघटनांनी केली त्यांनी हा इश्यू निर्माण करावा हाही एक मोठा विनोदच म्हणावा लागेल.

१५ मे २०१५च्या टाइम्समधील बातमीनुसार हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात गेलेले आहे. २० मे २०१४ रोजी उजवे भाजप सत्तेत आले हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे. ज्या गांधीजींची निंदानालस्ती स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात हिंदुत्ववाद्यांनी केली त्या महापुरुषाबद्दल खोटास का होईना पण काही नाटकी अविर्भाव आणि उमाळा दाखविणे यापेक्षा या सर्व प्रकरणाला काही अर्थ नाही. याची चर्चा अनेक वृत्तपत्रांतून, वाङमयीन नियतकालीकांतून विपुल झाली आहे. त्याबद्दल परत काही लिहिणे आवश्यक नाही. काही अपवाद वगळता सारेच हिंदुत्ववादी भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात गायबच होते हे इथे मुद्दामहून लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी स्वातंत्र्य युद्धात कोणतीही भरीव कामगिरी केलेली नाही (मुस्लिम लिगला सातत्याने विरोध करत राहणे यात त्यांचे मोठे योगदान आहे म्हणा). मात्र मलिदा खायला सर्वप्रथम हजर. हा यांचा पहिल्यापासूनचा इतिहास आहे. मुगल आले उर्दू शिकायला हे हजर; इंग्रज आले इंग्रजी शिकायला हेच पुढे. मोक्याच्या जागा ह्यांना सत्तेत हव्यात. आज तर ह्या हिंदूत्ववाद्यांचीच मुले सत्तेत आहेत. असो...

तामीळ लेखक, कवी, कादंबरीकार, इतिहासकार पेरूमल मुरूगन यांचेही यासंदर्भातले उदाहरण पहाण्यासारखे आहे. सहा कादंबऱ्या, सहा कथासंग्रह आणि चार काव्यसंग्रह एवढी साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या तीन कादंबऱ्या इंग्रजीत भाषांतरीत झाल्या आहेत. गव्हमेंट आर्टस कॉलेज, नम्मक्कल, तामिळनाडू येथे तामीळ भाषेचे प्राध्यापक म्हणून काम करणारे मुरुगन यांना तामीळ सरकारने अनेक साहित्य पुरस्कारही दिले आहेत. २०१० साली प्रसिद्ध झालेल्या *'मधुरोभंगन'* या कादंबरीवर हिंदूत्व संघटनांनी हल्लाबोल केला. धर्मभावना आणि हिंदू परंपरा यांचा अपमान करणारी ही कादंबरी 'बॅन' करा त्यावर बंदी घाला अशी मागणी केली गेली. १० जुलै २०१६ रोजी ही कादंबरी हिंदूत्ववादी संघटनांनी जाहीरपणे जाळली. निपुत्रिक जोडप्याला मध्यवर्ती ठेवून या कादंबरीत जातीभेदावर प्रकाश टाकण्यात आला आहे. वास्तववादी व खरे प्रसंग चितारल्यामुळे धर्म संस्था कशी सामान्यजन व दलितांचे शोषण करते याचे विदारक चित्रण या कादंबरीत आले आहे. यामुळे हिंदूत्ववादी संघटना बिथरून गेल्या. इंग्रजीत 'One Part Woman' या शीर्षकाने ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर या कांदबरीचे उपद्रव्यमूल्य वाढले. ५ जुलै २०१६ रोजी मद्रास हायकोर्टाने भारतीय घटनेच्या आर्टिकल ९ (१) (a) अन्वये निकाल दिला की, मुरुगन यांना या संदर्भात त्यांना माफी मागण्याची गरज नाही, शिवाय त्यांच्या पुस्तकांवर कुठल्याही प्रकारची बंदी आणली जाणार नाही. थोर नाटककार विजय तेंडुलकर यांचा *'घाशीराम कोतवाल'* आणि *'सखाराम बाईंडर'* या दोन नाटकांमुळे त्यांना अनेक वादाला सामोरे जावे लागले. *'घाशीराम कोतवाल'* हे पेशवाईचे चित्रण करणारे नाटक आहे तर *'सखाराम बाईंडर'* या नाटकातून स्त्री-पुरुष नाते, लैंगिकता या विषयावर बिनधास्त व खरेखुरे वास्तववादी झोत टाकलेला आहे.

हिंदुत्ववाद्यांप्रमाणेच मुस्लिम सनातन्यांचेही फार काही वेगळे नाही. त्यांनीही हाच उद्योग केला व तो अजूनही जोरात सुरूच आहे. सलमान *'रश्दी यांची 'द सॅटनिक व्हर्सेस'* (१९८८) ही कादंबरी जगभर गाजली ती एक कलाकृती म्हणून नव्हे तर मरणपंथाला लागलेल्या आयातोल्ला खोमेनी यांनी ती इस्लाम धर्माविरुद्ध आहे असे जाहीर केले म्हणून आणि जो त्यांनी फतवा काढला त्यामुळे. आज या वादग्रस्त कादंबरीबद्दल खूप लिहले गेले आहे. ती इस्लामविरोधी तर मुळीच नाही शिवाय या कादंबरीत कोणतेच गोंधळ व उपद्रव्यमूल्य. कुठल्याच अर्थाने दुरान्वयाने देखील ती इस्लाम धर्माचे अवमूल्यन किंवा अपमान वगैरे करत नाही. अभिताभ बच्चन आणि रेखा यांचे १९७०च्या दशकातील प्रेमप्रकरणावर आधारित काहीतरी चमचमीत लिहावे अशी ही कादंबरी आहे.

ज्या वादग्रस्त जहिलिया (Jahilia) प्रकरणाबद्दल नेहमी बोलले जाते तीसुद्धा निरुपद्रवी आहे. तिला खरे तर एक स्वप्न सिक्वेन्स म्हणता येईल. ज्या लट, मिझ्झा, मन्नत यांच्याशी मोहम्मदांचा वादविवाद झाला तो सर्व इस्लामिक इतिहासामध्ये अन्यस्यूत होता तोच या कादंबरीत आला आहे. ज्यात काहीच वादग्रस्त असे नाही. शिवाय 'द सॅटनिक व्हर्सेस' ही मुस्लीम परंपरा, मूल्ये, स्त्री-पुरुष यांच्याबद्दल अश्लील घाणेरडे बोलणारी कादंबरी आहे असे आरोप रश्दींवर झाले. जर कोणत्याही मोडकेतोडकेही इंग्रजी येणाऱ्या मुस्लीम व्यक्तीने ही कादंबरी वाचली तरी तिला या कादंबरीत काहीच आक्षेपार्ह असे दिसणार नाही. 'द सॅटनिक व्हर्सेस' या कादंबरीवर इस्लामीक जगाने बंदी आणली मग पॉल स्कॉटची *'ज्युवेल इन द क्राऊन'* या कादंबरीवर का बंदी आणली नाही. ही कादंबरी तर *'सॅटनीक व्हर्सेस'* पेक्षा अधिक वादग्रस्त ठरू शकली असती.

प्रकाशनानंतर अनेक मुस्लीम देशात ही कादंबरी विक्रीस उपलब्ध होती. पण कुणाचेही लक्ष तिच्याकडे गेले नाही. पण जेव्हा खोमेनी यांनी डरकाळी फोडली आणि रातोरात या कादंबरीवर बंदी आणली गेली. तिकडे इंग्लंडने रश्दी यांना संरक्षण दिले. सत्य काय होते ? इराक युद्धानंतर इराणीयन क्रांतीने मार खाल्ला होता आणि इस्लामिक इराणीयन सरकारला सगळ्या इस्लामिक जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवायला एवढी मोठी संधी खोमेनीने दिल्यामुळे हा सर्व प्रकार घडला होता. पण नंतरही हा फतवा मधेमधे धुरळा काढत राहीला. इस्लाम अस्मितेसाठीही याचा उपयोग झाला. या सगळ्या गोष्टींचा सर्वात मोठा फायदा सलमान रश्दी यांनाच झाला. ते एक आंतरराष्ट्रीय लेखक म्हणून नावारूपाला आले. आजही त्यांची भिस्त कमी झालेली नाही. खरेच इतक्या मोठ्या दर्जाचे ते लेखक आहेत का ? हाही एक प्रश्न आहेच.

हिंदुत्ववाद्यांपेक्षा इस्लामिकांचे सगळे उघड उघड असते; ते लगेच फथ्वा वगैरे काढतात किंवा सरळसरळ ठारच मारून टाकतात. ते फार कडवे (Radical) लोक आहेत असे म्हणूनच त्यांना म्हटले जाते. हिंदुत्ववाद्यांचे असे नसते. ते मागून किंवा छुप्या रितीने हल्ला चढवतात. कुपमूंडक मनोवृत्तीने चाल करतात छिद्रांन्वेशी रक्त त्यांच्यात सतत फिरत असते. या अशा वृत्तीमुळे ते आपल्या शत्रूंना जीवे मारतात पण तेही गारद्यांकडून स्वत: नाही ! हाही त्यांचा खूप जुना इतिहास आहे.

डॉ. नरेंद्र दाभोलकर काय सांगत होते ? 'समाज परिवर्तनाच्या प्रबोधन कार्यात सर्वात मोठा अडथळा हा अंधश्रद्धेचा आहे आणि तो आपण दूर करायला हवा'. त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य पणाला लावले होते. ही अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात धर्मसंस्थेतूनच उगवत असते. सहाजिकच डॉ. दाभोलकरांना धर्मसंस्थेवर हल्ला करावा लागला. इथेच हिंदू सनातन्यांचे दाभोलकरांशी वाद झाले. प्रबोधनपर भाषणे, लेखन, पथनाट्ये, तंत्रमंत्र, भानामती, सत्यसाईबाबा, वैदू, जादूचे प्रयोग अशा अनेक उपक्रमांतून सारा समाज विशेषत: तरुण वर्ग डॉ. दाभोलकरांनी ढवळून काढला. लोकांना फसवण्यासाठी निर्माण केलेले आपले विनासायास कमावलेले एक आर्थिक हत्यार हातातून निसटून जाण्याची चिन्हे दिसू लागल्यावर हे सनातनी गोंधळले. बुवाबाजीला आळा घालण्यासाठीचा कायदाही होऊ घातला आहे, हे पाहिल्यावर डॉ. दाभोलकरांवर हल्ला झाला. कॉ. गोविंद पानसरे या आदरणीय ज्येष्ठ कम्युनिस्ट नेत्यावरही हल्ला झाला; पुढे थोर संशोधक डॉ. कलबुर्गी यांचाही बळी घेण्यात आला. या तीनही हल्ल्यांत साम्य आणि यामागचा उद्देशही सारखाच होता.

काय करत होते हे तीन प्रबोधक ? समाजाला सुधारण्याचे काम करत होते का बिघडवण्याचे ? जे अक्षर साहित्य या थोर प्रबोधकांनी निर्माण केले ते परिवर्तनाच्या लढ्यासाठीच ! पण प्रत्यक्षात प्रतिगामी व स्थितीवादी सनातन्यांना हे कसे मान्य होईल ? या सर्वांचा परिणाम झाला. या तीनही थोर प्रबोधकांचा बळी गेला. थोडक्यात असे म्हणता येईल की अगदी बुद्धकाळापासून काळजीपूर्वक धर्म व साहित्याचा इतिहास तपासून पाहिला तर प्रागतिक पुरोगामी बदलाला पूरक किंवा परिवर्तनशिल संहितेला सनातन्यांनी कायम विरोध केला आहे. स्थितीशील संहितेला गतीशिल संहिता नको असते. याचे साधे कारण म्हणजे बसलेली किंवा प्रस्थापित झालेली समाजाची आर्थिक घडी त्यांना बदलायची नसते; त्यात त्यांचा विनासायास फायदा आणि स्वार्थ असतो, हे सांगायला नको.

★ ★ ★

# केरळ : नोटाबंदी विरोधात डाव्या लोकशाही आघाडीची ७०० किमीची जबरदस्त मानवी भिंत २० लाख लोकांचा अभूतपूर्व सहभाग

निश्चलीकरणाच्या नावावर जो अभूतपूर्व व जीवघेणा गोंधळ केंद्र सरकारने घातला आहे, त्यावरील जनतेच्या संतापाला केरळ राज्याने २९ डिसेंबरला एका प्रचंड मोठ्या मानवी साखळीच्या रुपाने वाट करून दिली. डाव्या व लोकशाही आघाडीने या नोटाबंदीच्या निषेधार्थ, एका मानवी साखळीचे आयोजन केले होते. मात्र सर्व थरांतून इतक्या प्रचंड प्रमाणात लोक यात सहभागी झाले की, ही साखळी आहे की मानवी भिंत, असा प्रश्न पडावा. तिरुवनंतपुरम ते कासरगोड अशा ७०० कि.मी.पेक्षा अधिक लांबीच्या राष्ट्रीय महामार्गावर लाखो लोकांनी हातात हात घालून ही मानवी साखळी उभारली. त्यात सुमारे २० लाख लोकांचा सहभाग होता.

तिरुवनंतपुरम येथील राजभवनापासून सुरू झालेल्या या मानवी साखळीची पहिली कडी होती केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन, तर शेवटची कडी होती माकपचे लोकसभेतील नेते व केंद्रीय कमिटी सदस्य पी. करुणाकरन !

केंद्र सरकारने पुरेशी पूर्वतयारी न करताच नोटाबंदीची घोषणा केली, परिणामी केरळच्या अर्थकारणाचा कणा असलेल्या सहकारक्षेत्राचा गळाच आवळला गेला. या दोन्ही घटनांमुळे केरळच्या जनतेत जो असंतोष खदखदत होता, त्याचे हा जमलेला प्रचंड जनसागर प्रतीकच होता.

राजभवन, तिरुवनंतपुरम येथे या मानवी साखळीत पिनराई विजयन यांचेसमवेत माकपचे राज्य सचिव कोडियेरी बालकृष्णन, माजी मुख्यमंत्री व्ही. एस. अच्युतानंदन, भाकपचे सचिव कनम राजेंद्रन, राष्ट्रवादी काँग्रेसचे उझवूर विजयन, जनता दल (से)च्या नीला लोहितादासन नाडर, हे सर्व नेतेही उपस्थित होते. तर इतरत्र माकपचे नेते ए. आनंदन, सहकारमंत्री के. सुरेंद्रन यांनीही या मानवी साखळीत सहभाग घेतला.

माकपचे पॅलिटब्यूरो सदस्य एम. ए. बेबी, भाकपचे नेते पनियन रविंद्रन यांनी या साखळीत कोची येथे, तर डाव्या लोकशाही आघाडीचे निमंत्रक आणि माकप नेते वाइकोम विश्वन यांनी अलापुझा येथे या साखळीत हजेरी लावली. माकपचे केंद्रीय कमिटी सदस्य व अर्थमंत्री थॉमस आयझॅक, कामगार मंत्री टी. पी. रामकृष्णन हे या मानवी साखळीत कोझिकोड येथे सामील झाले होते, केंद्रीय कमिटी सदस्य इ. पी. जयराजन आणि पी. के. श्रीमती यांनी कन्नूर येथे व महसूल मंत्री इ. चंद्रशेखरन यांनी कासरगोड येथे या मानवी साखळीत आपला सहभाग नोंदवला.

या सर्व डालोआच्या नेत्यांव्यतिरिक्त अनेक लेखक, सिनेअभिनेते, संगीतकार, क्रीडापटू यांनी देखील राज्यातील विविध ठिकाणी या साखळीत सहभाग घेतला. ही साखळी राष्ट्रीय महामार्गाच्या पश्चिमेला उभारण्यात आली होती. पथनमथिट्टा, कोट्टायम यासारख्या महामार्गावर नसलेले जिल्हे अलापुझा जिल्ह्यात ठिकठिकाणी या साखळीत सामील झाले होते. तर इडुकी, वायनाड इ. उंचसखल भागातील जिल्ह्यांनी स्वत:ची वेगवेगळी मानवी साखळी उभारली.

**– एन. एस. साजित**

# शेतकऱ्यांचे उध्वस्तीकरण

जयदीप हर्डीकर

शेतात वांगी पिकवणाऱ्या बंडू घोरमडेला ती खरेदी करणाऱ्या मध्यस्थाने दिलेली ५०० रु.ची जुनी नोट घेण्यावाचून पर्याय तर नव्हताच, पण त्याचबरोबर त्याला ४० किलो वांग्याच्या प्रत्येक टोपलीमागे २०० रुपये कमीही करावे लागले.

पन्नाशीच्या उंबरठ्यावर असलेले घोरमडे म्हटले, 'मी जर असे केले नसते, तर माझी सगळी ताजी वांगी वाया गेली असती.' नागपूरपासून ५० किमी अंतरावर चिंचोली गावात राहणारे घोरमडे वांग्याशिवाय गाजर, पालक आणि भेंडी या भाज्यादेखील पिकवतात. 'जे लोक धान्ये अथवा कापूस पिकवतात ते पैशांसाठी थांबू शकतात, मला ते शक्यच नाही', म्हणतात.

गेल्या कित्येक वर्षांपासून ऑक्टोबर ते डिसेंबर या तीन महिन्यात रोज घोरमडे ४०० किलो भाज्या घेऊन नागपूरच्या राज्यशासन संचलित शेती उत्पादन बाजार समितीच्या बाजारात येत असतात आणि तिथल्या परवानाधारक मध्यस्थांना आपला माल विकत असतात.

५००/१०००च्या नोटाबंदी झालेल्या नोव्हेंबर ८ पासून घोरमडेंना रोजच्या रोज नुकसान होते आहे. रोजच्या रोज बँकेच्या रांगेत तासनतास उभे राहून जमा झालेल्या या जुन्या नोटा भरण्याचे काम त्यांच्या मुलाच्या मागे लागले आहे. तरीही जुन्या नोटा घेत असल्याने का होईना पण घोरमडेंना निदान काही मिळते तरी आहे. भाजीपाला पिकवणाऱ्या अन्य शेतकऱ्यांचे उत्पन्न थांबलेले असून त्यांना प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागते आहे.

ठाणे आणि पुणे येथे शेतकऱ्यांना आपला भाजीपाला बाजारात कचराकुंड्यांमध्ये टाकून द्याव्या लागल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत. नागपूरपासून १६० किमी अंतरावर असलेल्या अमरावती जिल्ह्यातील हिवरखेडच्या गावबाजारात संत्री पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी विक्रीदरामध्ये झालेल्या तीव्र घटीचा निषेध म्हणून संत्र्यांच्या भरलेल्या टोपल्या रस्त्यावर फेकून दिल्या.

व्यापाऱ्यांनी खरेदी करणे बंद केल्यामुळे संत्र्यांचा विक्रीदर घटला होता आणि शेतकरी जुन्या नोटा घेण्यास तयार नसल्यामुळे व्यापाऱ्यांनी माल विकत घेणे बंद केले होते. नोटाबंदीचा निर्णय हा कुठलेही पूर्वनियोजन न करता अत्यंत बेजबाबदारपणे आणल्यामुळेच शेतकऱ्यांवर ही आपत्ती आलेली आहे की, जुन्या नोटा न स्वीकारण्याच्या त्यांच्या हट्टाग्रही कृतीमुळे त्यांच्यावर ही वेळ आली आहे?

बुधवार दि. १६ नोव्हेंबर रोजी ३८ वर्षांचे सुदाम पवार हे नागपूरपासून७० किमी अंतरावर असलेल्या वर्धा जिल्ह्यातील सेलू गावात आपल्याकडील ९ क्विंटल कापूस विकायला आलेले एकमेव शेतकरी होते.

व्यापाऱ्याने त्यांच्या खात्यामध्ये थेट पैसे जमा करण्याची तयारी दाखवली. पवार हे आमगाव नावाच्या खेड्याचे माजी सरपंच. त्यांनी या व्यवहाराला मान्यता दिली. कसल्याही कटकटीविना त्यांच्या खात्यात लगोलग पैसे जमा झाले.

त्यानंतर दिवसभरात मात्र त्यांच्या ओळखीच्या ८ अन्य शेतकऱ्यांनी जवळपास ८० क्विंटल कापूस विकला पण तो जुन्या नोटा घेऊन. बाजारात कापूस येण्यामध्ये झालेल्या घटीमुळे व्यापाऱ्यांनी ५,००० रुपये प्रति क्विंटल भाव देऊन तो विकत घेतला. प्रत्यक्षात त्या दिवशी कापसाचा बाजारभाव ४,७५० ते ४,९०० रु. होता.

बव्हंशी शेतकरी हे आपले पैसे बँकांमध्ये जमा करण्यासाठी तयार नसतात कारण त्यांची खाती ज्या बँकांमध्ये असतात त्याच बँकांकडून त्यांनी शेतीसाठी कर्जे घेतलेली असतात. बहुतेकांनी प्रदीर्घ काळ कर्जांची परतफेड केलेली नसते कारण कर्जही फेडायचे आणि घरही चालवायचे हे दोन्ही त्यांना मिळालेल्या उत्पन्नात शक्य होत नाही.

आपल्या मालाचे पैसे बँकांमध्ये गेले की, त्या बँका पुन्हा ते काढू देणार नाहीत आणि मार्चपर्यंत त्यांच्या कर्जाच्या रकमातील भाग वळता करून घेतील अशी शेतकऱ्यांना भीती असते. आणि तसे झाले तर आपले काही खरे नाही हे शेतकऱ्यांना माहीत असते.

खरे तर, बँका थेटपणे खात्यातील कर्जापोटी पैसे काढून घेतील असा शासकीय नियम नसतो. अर्थात, वेगवेगळी दबावतंत्रे वापरून आपला पैसा परत मिळवण्यात बँकाही तरबेज असतात. शेतकऱ्यांना बँकांना दुखावून चालणारे नसते कारण पुढच्या वर्षी पुन्हा त्यांना कर्जाची गरज लागणार असतेच.

पवार सांगतात, 'मी बँकेत थेट भरणा करून घेऊ शकलो कारण माझ्या नावावर एकही कर्ज नाही. तसेच मला ताबडतोब रोखीची देखील गरज नाही.' पण ते पुढे असेही म्हटले की, 'कर्ज आहेत पण ते वडिलांच्या नावावर आहे, त्यामुळे बँकेला माझ्या खात्यातून पैसे वळते करून घेता येणार नाहीत.'

त्या दिवशी कापूस विकणाऱ्या अन्य ८ शेतकऱ्यांनादेखील रोखीची गरज नव्हती, पण 'बहुतेक लहान शेतकरी हे केवळ निर्वाहापुरती शेती करत असतात, त्यांना अन्य कुठलेच उत्पन्न नसते. त्यामुळे ते ना चेक घेणार ना थेट बँकेत पैसा जमा करण्यासाठी तयार होणार,' पवार उद्गारले.

सेलूच्या शेती उत्पादन बाजार समितीचे उपाध्यक्ष आणि शेतकरी रामकृष्ण उमाठे म्हणतात, 'नोटाबंदीने शेतकऱ्यांना उध्वस्त केले आहे.' ही समिती शेतातल्या १०० गावांच्या बव्हंशी सोयाबीन आणि कापूस पिकवणाऱ्या शेतीउत्पादनांसाठी कार्यरत आहे. ते पुढे म्हणतात, 'नोटाबंदीच्या निर्णयानंतर जवळपास एक पूर्ण आठवडा बाजारात ना विक्रेते फिरकले ना खरेदीदार.'

साहजिकच मग हमाल, वाहतूकदार आणि अन्य पूरक सेवा पुरवणाऱ्यांना पूर्ण आठवडा काहीही काम नव्हते अशी माहिती बाजार समितीचे सहसचिव महेंद्र भांडारकर यांनी दिली.

खरे तर वर्षातल्या या काळात बाजारात जोरदार व्यवहार होत असतो, पण ८ नोव्हेंबरनंतर येणाऱ्या मालात प्रचंड घट झाली आहे, उमाठे म्हणाले. जिथे दिवसाला ५,००० क्विंटल कापूस यायचा तिथे कालपर्यंत एक क्विंटलही आला नव्हता. काल १०० पोती (क्विंटल) आली. उमाठे म्हणतात, 'आता व्यापारी चेकने किंवा थेटपणे पैसे बँकेत जमा करू पाहात आहेत पण कर्जापोटी बँका ते वळते करून घेतील या भीतीने शेतकरी तयार नाहीत.'

इथली बहुतेक शेतं ओलिताखाली येत नाहीत. शेतकरी आधीच प्रचंड आर्थिक ताणाखाली जगत आहेत. आधीच्या उसनवारी चुकवणे, उधारीवर घेतलेल्या शेतकी आदानांची बिले देणे, शेतमजुरांना वेतन देणे आणि धान्य दुकानदारांची देणी देणे. अशी सगळी कामे त्यांना रोखीतून करावी लागतात, उमाठे म्हणतात. 'यातून काही पैसा उरलाच तर तो बँकेत कर्जापोटी भरला जातो, अन्यथा कर्ज तसेच डोक्यावर राहते.'


शेतीउत्पादनांची विक्री आणि दर घटण्याचे आणखी एक कारण आहे, किरकोळ बाजारातून मालाचा उठाव कमी झाला आहे, असे राजेश ठाकर सांगतात. ठाकर नाशिकमध्ये टोमॅटोचे ठोक व्यापारी आहेत.

उदाहरणार्थ नागपूरच्या बाजारातून येणारी संत्री आलेली नाहीत कारण

*(पान ९ पहा)*

# कॉ. नारायण सावंत : दुर्दम्य इच्छाशक्तीचा कम्युनिस्ट कार्यकर्ता

**पी. आर. कृष्णन**



२९ सप्टेंबर २०१६ला सावंतवाडी तालुक्यातील निगुडे येथे महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांतील कर्मचाऱ्यांचे वरिष्ठ नेते, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि सीटूच्या स्थापनेच्या काळातील आघाडीचे कार्यकर्ते कॉम्रेड नारायण आत्माराम सावंत यांचे वयाच्या ८२व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यामागे त्यांच्या पत्नी सावित्री सावंत या आहेत.

कॉ. नारायण सावंत १९५८मध्ये अविभाजित कम्युनिस्ट पक्षाचे कार्डहोल्डर बनले. पण १९६४ साली सुधारणावाद्यांच्या विरोधात ते ठामपणे उभे राहिले व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेच्या काळात त्यांनी कार्यकर्ता म्हणून मोठी कामगिरी बजावली. कम्युनिस्ट नेते कॉम्रेड एस. वाय. कोल्हटकर यांच्याशी त्यांचे जवळचे संबंध होते. देशातील वर्तमानपत्र कर्मचारी आणि नोकरदार पत्रकारांची संघटना बांधण्यात अग्रेसर असलेले नेते ॲड. के. टी. सुळे, ॲड. एम. पी. मोरे आणि ॲड. मदन फडणीस यांचे ते घनिष्ठ सहकारी होते.

कॉ. नारायण सावंत 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या मुंबइतील आस्थापनात कामगार म्हणून कामाला असतानाच वाचनातून त्यांचा संबंध मार्क्सवाद - लेनिनवादाशी आला. कॉ. डांगे, कॉ. बी. टी. रणदिवे, कॉ. मिरजकर आणि कॉ. गंगाधर अधिकारी यांच्या सारख्यांच्या अभ्यासवर्गाला उपस्थित राहाण्याची त्यांना संधी मिळाली.त्यामुळे त्यांनी १९५८ साली कम्युनिस्ट पक्षाचे सभासदत्व स्विकारले व ते आयटकमध्ये काम करू लागले. त्यावेळेपासून जवळजवळ साठ वर्षे कॉ. नारायण सावंत यांनी वर्तमानपत्र कर्मचारी आणि नोकरदार पत्रकारांची संघटना उभारण्यात व त्याद्वारे त्यांचे प्रश्‍न सोडवण्यात घालवले. त्यावेळेपासून माझाही जवळजवळ सहा दशके त्यांच्याशी संबंध होता. कम्युनिस्ट पक्षाच्या विभाजनानंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात आणि सीटूत काम करताना तर या बुध्दीमान कार्यकर्त्याबरोबरचा संबंध अधिकच घनिष्ठ झाला.

कॉ. नारायण सावंत 'ऑल इंडिया न्यूज पेपर एम्लॉईज फेडरेशन (एआयएनईएफ)चे उपाध्यक्ष होते. तसेच 'टाइम्स ऑफ इंडिया ॲण्ड अलाईड पब्लिकेशन एम्लॉईज फेडरेशन'चे जनरल सेक्रेटरी होते. कॉ. एस. वाय. कोल्हटकरांच्या नेतृत्वाखाली देशभरातील वर्तमानपत्राच्या कर्मचाऱ्यांच्या व नोकरदार पत्रकारांचे जे तीन प्रमुख संप झाले ते संघटीत करण्यात व यशस्वी करण्यात खूप मोलाची भूमिका कॉ. सावंतांनी निभावली होती. एआयएनईएफच्या दिल्ली येथील मुख्यालयात ७ ऑक्टोबरला सावंतांच्या निधनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेत त्यांनी वर्तमानपत्राच्या कर्मचाऱ्यांच्या व नोकरदार पत्रकारांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी संघटनेची उभारणी करीत जो लढा दिला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा ठराव मंजूर करण्यात आला. ते सीटूच्या महाराष्ट्र कौन्सिलचे चार वेळा सभासद झाले. मृत्यूपर्यंत ते सीटूच्या मुंबई जिल्हा कमिटीचे सभासद होते. मुंबईतील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातील राजकीय सक्रियतेबरोबरच ते त्यांच्या सावंतवाडीच्या मूळ गावात किसान चळवळीतही सक्रिय होते.

कॉ. नारायण सावंतांनी केवळ संघर्षात्मक कामे केली असे नाही, तर कामगार आयुक्त, कामगार मंत्री, कामगार न्यायालय, औद्योगिक लवाद, वेतन मंडळे यांच्यापुढे कामगारांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ मांडण्यासाठी जी आकडेवारी लागते, जी सामग्री लागते, जी निवेदने तयार करावी लागतात, ती जमा करण्याच्या कामी खूप कष्ट घेतले. त्यामुळे कामगार प्रतिनिधींना, वकिलांना आपली बाजू मांडतांना खूपच फायदा झाला.

१९७२ साली सोव्हिएत युनियनच्या न्यूज पेपर एम्लॉईज फेडरेशनच्या आमंत्रणावरून भारतातून वर्तमानपत्रातील कर्मचाऱ्यांच्या युनियनचे जे पाच सदस्यांचे प्रतिनिधी मंडळ गेले होते, त्यात कॉ. सावंतांचा समावेश होता. त्यावेळेस सावंत १३ दिवस तेथे होते. तेवढ्या काळात सोव्हिएत युनियनच्या विविध भागात प्रवास करण्याची व तेथील वर्तमानपत्राच्या कामाचे स्वरूप, तेथील कामगारांचे राहणीमान न्याहाळण्याची संधी त्यांना मिळाली.

कॉ. नारायण सावंतानी गोवामुक्ती आणि पाँडेचरीमुक्तीच्या संघर्षात सक्रिय सहभाग घेतला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांना हुतात्मा चौकातील सत्याग्रहात अटकही झाली होती. चीन युध्दाच्या वेळेस नव्याने स्थापन झालेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या जवळजवळ १५०० कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. अनेकजण भूमिगत होते. मीही त्या काळात भूमिगत होतो. त्या भूमिगत काळात माझा सावंतांशी संबंध असायचा. आमच्यात आणि कॉ. एस. वाय. कोल्हटकर यांच्यात दुवा साधण्याचे जोखमीचे काम कॉ. सावंतांमार्फत होत असे. माझे मराठीतील 'ना संपलेल्या संघर्षातून एक प्रवास' हे पुस्तक प्रकाशित करण्यात बापू कवर आणि वाय. के. भडांगे यांच्या बरोबरीने कॉ. सावंतांचाही खूप मोठा हातभार लागलेला आहे.

कॉ. नारायण सावंत सुरुवातीच्या काळात प्रभादेवीला राहत असत. नंतर ते नवी मुंबईत बेलापूरला राहायला आले. तेथे कॉ. भाऊ पाटील आणि कॉ. कृष्णा खोपकर यांच्या साथीने बीटीआर भवनच्या उभारणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. या अत्यंत कष्टाळू, निष्ठावान आणि शिस्तप्रिय कार्यकर्त्याला आणि माझ्या सर्वात जुन्या सहकाऱ्याला मी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आणि सीटूच्या वतीने अखेरचा लाल सलाम करतो!

★ ★ ★